रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १४७
www.ramprahar.com
◆ रविवार, १४ डिसेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

सिडको घरांच्या किमतीत १० टक्के कपात/२
रविवारनिमित्त विविध विषयांवरील लेख/४
स्पर्धेदरम्यान मॅच फिक्सिंग; चार खेळाडू निलंबित/८

## ज्येष्ठ निवृत्त अधिकाऱ्याला हेरगिरी प्रकरणात अटक



**नवी दिल्ली :** भारतीय हवाई दलाच्या एका निवृत्त कर्मचाऱ्याला पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणांशी संबंध प्रस्थापित करणे आणि त्यांना संरक्षण क्षेत्राविषयी कागदपत्रे पुरवल्याच्या आरोपावरून आसाममधील तेझपूर येथे अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार संशयित आरोपी कुलेंद्र शर्मा हा ज्युनियर वॉरंट ऑफिसर म्हणून २००२ साली भारतीय हवाई दलातून निवृत्त झाला आहे. पोलिसांनी सांगितले की, त्याला भारताचे सार्वभौमत्व, एकता आणि अखंडता धोक्यात आणणारी कृत्ये करणे, भारत सरकारविरुद्ध युद्ध पुकारणे, गुन्हेगारी कट रचणे, गुन्ह्याचे पुरावे नष्ट करणे अशा आरोपांखाली अटक करण्यात आले आहे. आम्हाला एका विश्वसनीय सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार कुलेंद्र शर्मा हा पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणांशी संपर्क प्रस्थापित करत होता. त्यामुळे आम्ही त्याला अटक केली आणि चौकशी केली जात आहे.

### उर्वरित लाभार्थ्यांना घरघंटी व शिलाई मशीनचे वाटप सुरू

# सरकारी योजनांद्वारे महिलांचे सक्षमीकरण

### आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन; पनवेलमध्ये स्तुत्य उपक्रम





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामान्य नागरिकांचे हित केंद्रस्थानी ठेवून कार्य करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिलांच्या सर्वांगीण विकास व सक्षमीकरणासाठी दूरदृष्टीपूर्ण, प्रभावी आणि समाजाभिमुख योजना अमलात आणल्या आहेत. या योजनांमुळे महिलांना आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करण्याची नवी दिशा मिळत असून त्यांचा सामाजिक व आर्थिक स्तर अधिक भक्कम होत आहे, असे प्रतिपादन कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी शनिवारी (दि. १३) येथे केले.

पनवेल विधानसभा मतदारसंघातील महिलांना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकारातून राबविण्यात येत असलेल्या घरघंटी व शिलाई मशीन वाटप उपक्रमाचा पुढील टप्पा शनिवारपासून सुरू झाला. काही दिवसांपूर्वी या योजनेचा शुभारंभ करण्यात आला होता. शहरी भागातील प्रभाग १४ ते २०मधील लाभार्थी महिलांना या वेळी मशीनचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात ते प्रमुख मान्यवर म्हणून बोलत होते.

प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेंतर्गत जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमांतर्गत एकूण ४,२५० पात्र महिलांची निवड करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात मोठ्या संख्येने महिलांना शिलाई मशीन व घरघंटीचे वाटप करण्यात आले होते. शनिवारपासून शहरी भागातील लाभार्थी महिलांना मशीन व प्रमाणपत्रांचे वाटप करून हा उपक्रम यशस्वीरीत्या पूर्णत्वास नेण्यात येत आहे. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनातून या वेळी उपस्थित सर्वांना बालविवाहाविरोधात शपथ देण्यात आली.

पनवेल मार्केट यार्ड येथे झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी महापौर कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, सीता पाटील, भाजप जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, माजी पनवेल शहराध्यक्ष अनिल भगत, विद्यमान शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, नवीन पनवेल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील, माजी नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे, एकनाथ गायकवाड, प्रभाकर बहिरा, रघुनाथ बहिरा, मुकीत काझी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुशीला घरत, डॉ. सुरेखा मोहोकर, वृषाली वाघमारे, राजेश्री वावेकर, वर्षा नाईक, नीता माळी, रेणुका मोहोकर, कामगार आघाडीचे प्रदेश सचिव संजय भगत, रूपेश नागवेकर, उमेश इनामदार, केदार भगत, प्रीतम म्हात्रे, संयोजक संतोष पवार, ॲड. चेतन जाधव, युवा मोर्चाचे शहराध्यक्ष हिमेश बहिरा, सपना पाटील, भीमराव पोवार यांच्यासह हजारोच्या संख्येने लाभार्थी उपस्थित होत्या. (पान २ वर..)

### ‘दिबां’चेच नाव विमानतळाला असणार!

या वेळी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नामकरणासंदर्भात बोलताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, भाजपचे सरकार आले आणि लोकनेते दि.बा. पाटील यांच्या नावाचा ठराव झाला, मात्र ‘दिबां’च्या नावाला तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने विरोध केला होता. ‘दिबां’च्या नावासाठी आम्ही लढा उभारला. आमच्यावर विमानतळ नामकरणाच्या पाच पाच फौजदारी गुन्हे आहेत. त्यामुळे विरोधकांनी गमजा मारू नयेत. पुणे येथील विमानतळाला जगद्गुरू संत तुकाराम, संभाजीनगर विमानतळाला छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव देण्यात येणार आहे. तेथेही तांत्रिक प्रकियेमुळे उशीर होत असून ‘दिबां’चेच नाव नवी मुंबई विमानतळाला असणार आहे, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणातून अधोरेखित केले.

## आगामी निवडणुकांसाठी ऑफलाईन उमेदवारी अर्ज दाखल करता येणार

**मुंबई : प्रतिनिधी**

आगामी महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी ऑफलाईन उमेदवारी अर्ज दाखल करता येईल, अशी माहिती महाराष्ट्र राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी शनिवारी (दि. १३) दिली. या दृष्टीने राज्य आयोगाने २९ महानगरपालिका, ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्यांच्या निवडणुकांचे नियोजन करण्यात आले आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत राज्य निवडणूक आयोगाची शनिवारी मुंबईत बैठक झाली. त्या वेळी वाघमारे बोलत होते.

संभाव्य दुबार मतदारांसंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने सर्व संबंधित महानगरपालिका आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेने संभाव्य दुबार मतदारांचा शोध घेण्यासाठी स्वतंत्र संगणक प्रणाली विकसित केली आहे. त्याद्वारे आणि घरोघरी जाऊन संभाव्य दुबार मतदारांचा शोध घेण्याची दक्षता घेण्यात येत आहे. त्याचबरोबर मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने maha sec voterlist.in हे संकेतस्थळ उपलब्ध करून दिल्याचे आयुक्त वाघमारे यांनी सांगितले.

## डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाहीर



**नागपूर :** अमरावती येथील श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार यंदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाहीर झाला आहे. राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त आयोजित महोत्सवात विदर्भातील शेतकऱ्यांचाही सन्मान करण्यात येणार आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दिलेल्या निधीतून शेतीक्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी महिलेला शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार, तर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निधीतून पुरुष शेतकऱ्याला शरद जोशी उत्कृष्ट पुरुष शेतकरी पुरस्कार देण्यात येणार आहे.

## निवडक

### पंतप्रधान मोदी उद्यापासून तीन देशांच्या दौऱ्यावर

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या सोमवार (दि. १५)पासून जॉर्डन, इथिओपिया आणि ओमान या तीन देशांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात ते जॉर्डनचे राजे अब्दुल्ला बिन अल हुसेन यांच्या निमंत्रणावरून १५ ते १६ डिसेंबरदरम्यान जॉर्डनला भेट देतील. भारत हा जॉर्डनचा तिसरा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे, तर १६ ते १८ डिसेंबर दरम्यान मोदी आधी इथिओपियाला आणि नंतर ओमानला भेट देणार आहेत.

### स्टार फुटबॉलपटू मेस्सीच्या कोलकाता भेटीला गालबोट

**कोलकाता :** अर्जेंटिनाचा स्टार फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी शनिवारी (दि. १३) कोलकात्याच्या आयकॉनिक सॉल्ट लेक स्टेडियममध्ये दाखल झाला. त्याची झलक पाहण्यासाठी चाहत्यांनी गर्दी केली होती, मात्र तो १० मिनिटांनी निघून गेल्याने निराश झालेल्या काही चाहत्यांनी पोस्टर फाडले, बाटल्या फेकल्या. यामुळे स्टेडियमवर तणाव निर्माण झाला होता. (सविस्तर पान ८ वर..)

## मुंबई-गोवा महामार्गावर कारची कंटेनरला धडक

### दोन जण ठार, दोघे जखमी



**कोलाड : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील रोहा तालुक्यातील पुई येथील बसथांब्याजवळ कारने कंटेनरला पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला, तर दोघे गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना शनिवारी (दि.१३) सकाळी सव्वासातच्या सुमारास घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादीच्या ताब्यातील कंटेनर (एमएच ११ डीडी ०४२५) मुंबईकडून कोलाडकडे जात होता. कंटेनर पुई गावाच्या हद्दीतील बसस्टॉपजवळ आल्यानंतर मुंबईकडून कोलाडकडे येणाऱ्या भरधाव कारने (एमएच ४६ सीयू ८४५३) धडक दिली.

या अपघातात कारमधील ओवेस सज्जाद सरखोत आणि सज्जाद अब्दुल सखुर सरखोत (रा. वणी पो. पुरार, ता. माणगाव) हे दोघे ठार झाले, तर कारचालक हुसबान अब्दुल हमीद कारविनकर (वय २०, रा. आंबेत, ता. म्हसळा) तसेच सरजित सज्जाद सरखोत (रा. वणी पो. पुरार, ता. माणगाव) हे दोघे जखमी झाले आहेत.

अपघाताची माहिती मिळताच कोलाड पोलीस व रेस्क्यू टीम यांनी तत्काळ मदत केली. अपघाताची नोंद कोलाड पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

## पत्रकार संघाचे विश्रामधाम कौटुंबिक जिव्हाळा जपेल -लोकनेते रामशेठ ठाकूर



**लोणावळा : प्रतिनिधी**

बातम्यांच्या रोजच्या धकाधकीत पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबियांना क्षणभर विश्रांतीसाठी मुंबई मराठी पत्रकार संघाने लोणावळा येथील दी.गो. तेंडुलकर स्मृतिमंदिरातील विश्रामधामाचे हाती घेतलेले नूतनीकरण वेळेत पूर्ण होईल, असा आशावाद व्यक्त करीत हे विश्रामधाम कौटुंबिक जिव्हाळा जपणारे केंद्र बनेल, अशा शुभेच्छा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पायाभरणी समारंभात दिल्या. २० लाख रुपयांची देणगीही त्यांनी या वेळी जाहीर केली.

या विश्रामधाम नूतनीकरणासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आतापर्यंत एकूण ७० लाख रुपयांची देणगी जाहीर केली आहे, तर कामगार नेते महेंद्र घरत यांनीही या उपक्रमासाठी पाच लाख रुपयांची देणगी या वेळी जाहीर केली.

कार्यक्रमास भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, पन्नास वर्षापूर्वी विश्रामधाम उभारणीत सक्रीय सहभाग असलेले माजी अध्यक्ष कुमार कदम, कार्यवाह शैलेंद्र शिर्के, उपाध्यक्ष स्वाती घोसाळकर, विश्वस्त राही भिडे, देवदास मटाले, अजय वैद्य, प्रकल्प निरीक्षक दीपक म्हात्रे, वास्तुविशारद मनोज गोलतकर, राजू माळी यांच्यासह कार्यकारिणी सदस्य तसेच अनेक पत्रकार उपस्थित होते.

पत्रकार संघाचे लोणावळा येथील विश्रामधाम थ्री-स्टार करण्याचा शब्द विद्यमान कार्यकारिणीने दिला होता. विद्यमान विश्वस्त, आजी-माजी अध्यक्ष आणि विश्वस्तांच्या सूचनांचा एकत्रित विचार करून अखेर थ्री-स्टार विश्रामधामाच्या स्वप्नपूर्तीच्या दिशेने पहिले दमदार पाऊल मुंबई मराठी पत्रकार संघाने टाकले आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते लोणावळा येथे या प्रकल्पाची पायाभरणी करण्यात आली. (पान २ वर..)

## केरळच्या राजधानीत भाजपचा ऐतिहासिक विजय

### डाव्या पक्षांचा बालेकिल्ला ढासळला



**तिरुवनंतपुरम : वृत्तसंस्था**

केरळमध्ये झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये भाजपने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. आतापर्यंत राज्यात नाममात्र अस्तित्व असलेल्या भाजपने केरळची राजधानी असलेल्या तिरुवनंतपुरम महापालिकेमध्ये दणदणीत विजय मिळवला आहे. या विजयासोबतच भाजपने येथील महापालिकेतील डाव्या पक्षांची ४५ वर्षांपासूनची सत्ता संपुष्टात आणली आहे.

तिरुवनंतपुरम महापालिकेतील १०१ जागांपैकी १०० जागांसाठी मतदान झाले होते. यातील ५० जागांवर भाजपच्या नेतृत्वाखाली एनडीएने विजय मिळवला, तर डाव्या पक्षांची आघाडी असलेल्या एलडीएफला २९ जागांवर समाधान मानावे लागले. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूडीएफ ही आघाडी १९ जागांसह तिसऱ्या क्रमांकावर राहिली, तर दोन जागांवर अपक्षांनी विजय मिळवला. त्यामुळे आता या महापालिकेमध्ये एनडीएची सत्ता येणार हे जवळपास निश्चित झाले आहे.

तिरुवनंतपुरमन महापालिकेवर गेल्या अनेक वर्षांपासून डाव्या पक्षांची सत्ता आहे, तर तिरुवनंतपुरम लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शशी थरूर हे सातत्याने निवडून येत आहेत, मात्र गेल्या काही वर्षांपासून या भागात आपला प्रभाव वाढवत असलेल्या भाजपने येथील डावे पक्ष आणि काँग्रेसचे वर्चस्व मोडून काढत हे ऐतिहासिक यश मिळवले आहे.

### पंतप्रधानांकडून अभिनंदन!



तिरुवनंतपुरम येथील महापालिकेत मिळालेल्या ऐतिहासिक यशानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनता आणि भाजपच्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले आहे. सोशल मीडिया एक्स प्लॅटफॉर्मवरून प्रतिक्रिया व्यक्त करताना त्यांनी म्हटले की,’धन्यवाद तिरुवनंतपुरम!’ तिरुवनंतपुरम महानगरपालिकेत भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएला मिळालेला जनादेश हे केरळच्या राजकारणाला मिळालेले एक ऐतिहासिक वळण आहे.

## ‘ईडी’चे राज्यात ४० ठिकाणी छापे

**मुंबई : प्रतिनिधी**

ईडी अर्थात सक्तवसुली अंमलबजावणी संचालनालयाने मनी लॉण्डरिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत पडघा-बोरीवली परिसरासह दिल्ली, कोलकाता, हजारीबाग, प्रयागराज, दमण व रत्नागिरीसह ४० ठिकाणी छापेमारी केली. ही छापेमारी साकिब नाचन आणि इतरांशी संबंधित अत्यंत कट्टर खड्खड दहशतवादीविरुद्ध सुरू असलेल्या तपासाचा भाग होती.

छापेमारीदरम्यान ९.७० कोटींच्या चल-अचल मालमत्तेची जप्ती करण्यात आली आहे. यात रोख रक्कम ३.७० कोटी आणि सहा कोटींच्या सोन्याच्या दागिन्यांचा समावेश आहे तसेच संशयितांशी संबंधित २५ बँक खाती गोठवण्यात आले आहेत. विविध आरोपपत्र, कट्टरपंथी साहित्य, डिजिटल साधने आणि इतर पुरावेही जप्त करण्यात आले.

## खेळामुळे व्यक्तीमत्त्व विकास -माजी सभागृह नेते परेश ठाकूर

### राज्यस्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धेचे उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खेळ केवळ शारीरिक तंदुरूस्तीसाठीच नव्हे, तर मानसिक आरोग्यासाठीदेखील महत्त्वाचा आहे. खेळामुळे व्यक्तीमत्त्व विकास साधला जातो. यातून आजच्या स्पर्धात्मक युगात अनेक संधीही प्राप्त होतात, असे प्रतिपादन पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी राज्यस्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धेच्या उद्घाटनावेळी केले.

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, रायगड जिल्हा क्रीडा परिषद आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त राज्यस्तरीय टेबल टेनिस स्पर्धा रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल येथील महात्मा फुले महाविद्यालयात आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. १२) झाले.

स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाला महाविद्यालयाचे प्राचार्य गणेश ठाकूर, जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ, शिवछत्रपती पुरस्कार विजेते संजय कडू व सूर्यकांत ठाकूर, आंतरराष्ट्रीय कोच जयदीप भिवंडकर, सचिन पुरी, आर.ए. पाटील, ईश्वर कदम, दत्तात्रेय साळस्कर, राजाराम कुंभार, जगदिश मरागजे, सुचिता ढमाले आदी उपस्थित होते.

१७ वर्षांखालील मुले व मुलींची ही स्पर्धा १२ ते १४ डिसेंबरदरम्यान रंगणार आहे. या स्पर्धेत राज्याच्या आठ महसूली विभागातून आणि क्रीडा प्रबोधिनीच्या संघासह एकूण नऊ विभागातून ४५ मुले आणि ४५ मुली सहभागी झाले आहेत. स्पर्धेतील विजयी संघ आणि निवड चाचणीतून निवडल्या गेलेल्या उत्कृष्ट खेळाडूंना २६ ते ३१ डिसेंबर या कालावधीत तामिळनाडूतील पेराम्बुदुर येथे होणाऱ्या राष्ट्रीय शालेय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे.

# सिडकोच्या घरांच्या किमतीत १० टक्के कपात

## १७ हजार घरांची लॉटरी लवकरच!



**नागपूर : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील सिडकोच्या वेगवेगळ्या प्रवर्गातील घरांसाठी सिडकोने जे दर निश्चित केले होते त्यामध्ये थेट १० टक्के कपात करण्यात येत असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान परिषदेत निवेदनाद्वारे केली. या निर्णयामुळे आता ही घरे पूर्वीपेक्षा स्वस्त दरात उपलब्ध होणार असून नवी मुंबई परिसरात घर घेण्याचे सर्वसामान्यांचे स्वप्न आता अधिक सुकर होणार आहे.

यासंदर्भात आज नागपुर येथे अधिवेशनात विधानपरिषदेत निवेदन करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, सिडकोतर्फे नवी मुंबईतील खारघर, वाशी, खारकोपर, तळोजा, उलवे, कळंबोली, कामोठे आणि पनवेल या परिसरात तब्बल १७ हजार घरे बांधण्यात आली आहेत.

या घरांसाठीची लॉटरी प्रक्रिया येत्या दोन महिन्यांत पूर्ण केली जाणार आहे. त्यापूर्वी सर्वसामान्यांना दिलासा देण्यासाठी घरांच्या किमती कमी करण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले. इडब्ल्यूएस आणि एलआयजी या प्रवर्गातील घरांच्या किमती १० टक्के कमी होतील.

या संदर्भात माहिती देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सर्वांसाठी घरे या संकल्पनेला बळ देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना नवी मुंबई परिसरात परवडणाऱ्या दरात अधिकृत आणि चांगल्या दर्जाची घरे मिळणे शक्य होणार आहेत.

# नरभक्षक बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यात नागाव–साखर–आक्षी परिसरात धुमाकूळ घालणाऱ्या बिबटयांचा त्वरेने बदोबस्त करावा अशी मागणी भाजप कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनपत्रामध्ये केली असून बिबटयांला अदयाप जेरबंद न करणे ही जिल्हा प्रशासनाची नामुष्की असल्याचा आरोप या निवेदनात करण्यात आला आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, गेले चार दिवस नागांव साखर, आक्षी या परिसरात बिबट्याने मानवी वस्तीत घुसून आतापर्यंत ५ ते ६ माणसांवर हल्ला केला आहे, त्यानंतर पुन्हा साखर परिसरात २ माणसांवर हल्ला केला. दरम्यानच्या काळात वनविभागाने तसेच पुण्याहून आलेल्या रेस्क्यू टिमने बिबट्याला पकडण्याचा प्रयत्न केला. सदर बिबट्या या टिमच्या फक्त १० फुट इतक्या आवाक्यात असूनही योग्य त्या साधन सामुग्रीच्या अभावामुळे बिबट्या प्रशासनाच्या हातावर तुरी देऊन पसार झाला. नंतर एक दिवस बिबट्याला शोधण्याचा प्रयत्न केला. नंतर सदर बिबट्या त्याच्या नैसर्गिक अधिवासात गेला असावा असा दावा प्रशासनाने करुन नागरिकांना सुरक्षिततेच्या सूचना देऊन बिबट्याची शोध मोहीम थांबवली.



# इमारत नूतनीकरण उद्घाटन व संरक्षण भिंत पायाभरणी

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते पाटणमध्ये सोहळा



**सातारा : प्रतिनिधी**

न्यू इंग्लिश स्कूल मुरुड, ता. पाटण, जि. सातारा या विद्यालयामध्ये शनिवारी (दि. १३) इमारत नूतनीकरण उद्‌ाटन व संरक्षण भिंत पायाभरणी समारंभ तसेच थोर देणगीदार साहेबराव देशमुख यांचा जीवनगौरव सत्कार समारंभ विविध मान्यवरांच्या उपस्थितीत अतिशय उत्साहात संपन्न झाला.

सर्वप्रथम रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते संरक्षण भिंत पायाभरणी समारंभ झाला. त्यानंतर त्यांच्याच हस्ते नूतनीकरण इमारतीचे उद्‌घाटन झाले. रयत शिक्षण संस्थेचे संघटक डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते बोलक्या भिंतीचे अनावरण करण्यात आले.

सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत व सत्कार, मा. श्री. साहेबराव देशमुख यांचा जीवनगौरव सत्कार समारंभ पार पडला. यानंतर उपस्थिताना संबोधित करताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना आजच्या काळामध्ये शिक्षणातील महत्त्व सांगताना प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षण घेऊन एक उत्तम नागरिक घडावा तसेच पुढील काळात विद्यार्थ्यांनी व्यावसायिक शिक्षण घेण्यावर व त्याद्वारे उद्यमिता विकसित करणे ही काळाची गरज असल्याचे नमूद केले. इतर सर्व मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

डॉ. अनिल पाटील यांच्या अध्यक्षीय भाषणाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमास माजी सार्वजनिक बांधकाम व पर्यटनमंत्री श्रीमंत विक्रमसिंह पाटणकर, कोयना शिक्षण संस्थेचे सचिव अमरसिंह पाटणकर, संस्थेचे संचालक संजय चव्हाण यांनीही उपस्थिती नोंदविली. त्याचबरोबर विकास देशमुख, संजीव पाटील, अ‍ॅड. रवींद्र पवार, बंडू पवार, नवनाथ जगदाळे उपस्थित होते.

# माथेरानमध्ये रेल महोत्सव : हेरिटेज मिनीट्रेनकडे मध्य रेल्वेचा वाढता कल

नेरळ: प्रतिनिधी

'माथेरानची राणी' अशी ओळख असलेल्या माथेरानच्या ऐतिहासिक मिनीट्रेनचा गौरवशाली प्रवास आता पर्यटनाच्या दृष्टीने नव्या रूपात पर्यटकांसमोर उलगडला आहे. मध्य रेल्वेच्या वतीने माथेरान रेल्वे स्थानकात भव्य रेल महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, या उपक्रमातून इतिहास, वारसा आणि पर्यटन यांचा सुंदर संगम साधण्यात आला आहे.

माथेरानच्या शोधापासून ते आजपर्यंत मिनीट्रेनने घेतलेल्या



विविध वळणांचा इतिहास सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने हा रेल महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. जुन्या वस्तीचे प्रदर्शन, वाफेवर चालणारे इंजिन, बदलते रेल्वे स्थानकांचे डिझाइन, फोटो–फ्रेम्स, ध्वनिचित्रफिती आणि त्या काळातील वस्तूंचे संग्रहालय अशा विविध माध्यमांतून माथेरान–मिनीट्रेनचा शंभर वर्षांहून अधिक काळाचा प्रवास उलगडून दाखवण्यात आला आहे.

**मिनीट्रेनचा शंभर वर्षांचा प्रवास**

ठाण्याचे तत्कालीन कलेक्टर ह्युज मॅलेट यांनी माथेरानचा शोध लावल्यानंतर १९०० साली माथेरान वसवण्यात आले. मात्र, सर्वात मोठी समस्या होती ती दळणवळणाची. ही अडचण ओळखून सर आदमजी पिरभाय व त्यांचे पुत्र अब्दुलहुसेन पिरभाय यांनी १९०१ ते १९०७ या काळात मिनीट्रेन प्रकल्पाची मुहूर्तमेढ रोवली. २८ जुलै १९०४ रोजी अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर कामाला वेग आला आणि पुढे ही मिनीट्रेन माथेरानच्या जीवनरेषेचा अविभाज्य भाग बनली.१९०७ ते १९३८ या काळात वाफेवर चालणाऱ्या इंजिनांनी सेवा दिली, १९३८ ते १९८३ दरम्यान मोठे तांत्रिक बदल झाले आणि त्यानंतर आधुनिकतेची कास धरत आजपर्यंत मिनीट्रेनने आपले अस्तित्व जपले आहे. हा संपूर्ण प्रवास ध्वनिचित्रफितीद्वारे पर्यटकांना अनुभवता येत आहे.

**हेरिटेज ट्रेनने वेधले लक्ष**

दि. १३ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता मध्य रेल्वेचे प्रधान मुख्य यांत्रिकी अभियंता सागर सर यांच्या हस्ते फित कापून रेल महोत्सवाचे उद्घाटन झाले. यावेळी हारफुलांनी सजवलेली, जुन्या पद्धतीच्या रंगरंगोटीतील हेरिटेज मिनीट्रेन स्थानकात दाखल होताच पर्यटकांमध्ये उत्सुकता शिगेला पोहोचली. पारंपरिक बोगी, ऐतिहासिक इंजिन आणि प्रशस्त खिडक्यांमधून वाहणारी खेळती हवा अनुभवण्यासाठी पर्यटकांनी एकच गर्दी केली होती.

मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील डी. नीला यांनी हेरिटेज मिनीट्रेनचे महत्व विशद करताना सांगितले की, ही ट्रेन केवळ वाहतूक साधन नसून माथेरानच्या इतिहासाचा जिवंत वारसा आहे.

यावेळी बोलताना सागर सर म्हणाले, मिनीट्रेनला पुन्हा जुन्या हेरिटेज रूपात सादर केले आहे. हा लूक पर्यटकांना नक्कीच आकर्षित करेल. ही मिनीट्रेन मध्य रेल्वेची आणि माथेरानची ओळख आहे. या प्रवासातून पर्यटकांना निसर्ग आणि इतिहासाचा मनसोक्त आनंद मिळेल.

# रातवड माध्यमिक विद्यामंदिर येथे वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील छत्रपती शिक्षण मंडळ,कल्याण संचलित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडेला महत्त्व देत या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

गुरुवार दि. ११ डिसेंबर रोजी या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन प्रमुख अतिथी उद्योजक अशोक धारिया,टी.टी.ई. प्रशांत शेटे, ग्रामपंचायत रातवड सरपंच वैशाली जाधव व उपसरपंच सतीश पवार यांच्या शुभहस्ते झाले. उद्घाटनप्रसंगी संचलन, मानवंदना, क्रीडाध्वज फडकावणे, क्रीडाज्योत प्रज्वलन तसेच क्रीडा शपथविधी पार पडला. मान्यवरांनी




विद्यार्थ्यांच्या क्रीडागुणांचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या क्रीडा महोत्सवात सांघिक कबड्डी, खो–खो, क्रिकेट तसेच वैयक्तिक धावणे,बुद्धिबळ,फेकी,रिले आदी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. एकूण १३५ विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. शनिवार दि.१३ डिसेंबर रोजी सकाळी आयोजित पारितोषिक वितरण समारंभात अ‍ॅड. सुनील मोंडे,विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष कदम व पालकवर्ग यांच्याहस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. सर्व विजयी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्रे व शैक्षणिक साहित्य प्रदान करण्यात आले.

# पोलादपूरच्या ज्येष्ठ समाजसेविका कांचन बुटाला यांना समाजभूषण पुरस्कार

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील ज्येष्ठ समाजसेविका कांचनताई शरद बुटाला यांना माणगांव येथील 'कोकण फेस्टीवल'मध्ये समाजभूषण पुरस्कार २०२५ सिनेअभिनेत्री अलका कुबल आणि 'चला हवा येऊ द्या' फेमडॉ.निलेश साबळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

पोलादपूर तालुक्यात अंगणवाडया व बालवाडयांची निर्मिती करून बालसंस्कारांसह महिलांना रोजगार निर्माण करणाऱ्या कांचनताई बुटाला यांनी घरेलू कामगार, महिला अत्याचार व कौटूंबिक हिंसाचार, विवाह समुपदेशन, दलित समाजातील



विद्यार्थ्यांचे शिक्षण, विद्यार्थी वसतीगृह, महिला दक्षता समिती, पोलादपूर पंचायत समितीच्या प्रभारी सभापती, ज्येष्ठ नागरिक संघाची उभारणी स्थापना तसेच अध्यक्षपद या माध्यमातून वरिष्ठ नागरिकांसाठी सहली, विविध उपक्रम, अधिवेशनांचे आयोजन तसेच समाजसेवा करण्यासोबतच महिला तसेच ज्येष्ठांचे संघटन उभारणी केली. अगदी सुरूवातीच्या काळातच आर्थिक मागास तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी केलेल्या कामाची दखल तत्कालीन समाजकल्याण मंत्री तसेच माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी घेऊन कांचनताई बुटाला यांची विशेष प्रशंसा केली होती. महिला विषयक तसेच सामाजिक कार्य आणि ज्येष्ठांप्रती केलेल्या कार्याबद्दल विविध संस्था आणि संघटनांनी कांचनताई बुटाला यांच्या कार्याचा विविध पुरस्कारांनी सन्मान केला आहे.

जागतिक महिला दिनानिमित्त विविध संस्थांकडून सन्मान असे महत्वाचे गौरव कांचनताई बुटाला यांच्या आतापर्यंतच्या वाटचालीमध्ये झाले आहेत.

पान १ वरुन

## सरकारी योजनांद्वारे महिलांचे सक्षमीकरण

आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात पुढे बोलताना सांगितले की, सर्वसामान्यांच्या हिताचा केंद्रबिंदू ठेवून कार्य करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी दूरदृष्टीपूर्ण व परिणामकारक योजना राबविल्या आहेत. महिलांना केवळ लाभार्थी न ठेवता त्यांना सक्षम उद्योजक, आत्मनिर्भर व्यक्ती आणि कुटुंबाच्या आर्थिक प्रगतीचा कणा बनविण्याचा या योजनांचा उद्देश आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक भगिनीने शासनाच्या विविध योजनांचा योग्य लाभ घेत स्वतः मधील कौशल्यांचा विकास करावा, नवे तंत्र आत्मसात करून स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात आणि कुटुंबाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी पुढाकार घ्यावा. महिलांनी आत्मविश्वासाने पुढे येत आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारल्यास केवळ कुटुंबच नव्हे, तर समाज आणि राष्ट्राचीही प्रगती अधिक वेगाने साध्य होणार असून पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री फडणवीस यांचे आभार मानतो की, त्यांनी ही खनिकर्म योजना आणली आणि त्या माध्यमातून आम्हाला या सर्व बहिणींना योजनेचा लाभ देता आला.

२०१४ सालच्या आधीही योजना होत्या, मात्र त्या प्रत्यक्ष लाभार्थीपर्यंत पोहचत नव्हत्या. मोदीजी पंतप्रधान झाल्यानंतर सर्व स्तरांसाठी योजना अमलात आल्या आणि त्या प्रभावी व यशस्वीपणे राबविल्या जात आहेत. कोविडचे संकट आले होते, त्या वेळी मोदींजींनी देशातील प्रत्येक माणसाचा विचार केला, तर राज्यात तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने कोणताच दिलासा नाही. उलट कल्याणकारी प्रकल्पांना स्थगिती दिली. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार आल्यानंतर योजनांना बळ मिळाले. त्याचबरोबरीने लाडकी बहीण योजना आणून बहिणींना लखपती बनविण्याचे प्रयत्न सुरू केले. आता या योजनेवर विरोधक टपून बसले आहेत आणि ही योजना बंद करण्यासाठी वाट पहात आहेत, असा टोला आमदार प्रशांत ठाकूर यांनी विरोधकांना लगावला.

***लाडक्या प्रशांतदादांच्या पुढाकाराने सर्व समाजासाठी लोककल्याणकारी कार्य –जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी***

भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, पनवेल विधानसभा मतदारसंघात सर्व समाजघटकांच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार प्रशांत ठाकूर हे सातत्याने व तळमळीने कार्यरत असून सामान्य नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी विविध लोककल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवत आहेत. महिलांचे सक्षमीकरण, युवकांना रोजगाराच्या संधी, सामाजिक घटकांना आधार देणाऱ्या योजना अशा अनेक उपक्रमांमुळे आमदार प्रशांत ठाकूर यांची नाळ सर्वसामान्य जनतेशी घट्ट जोडली गेली आहे.

सर्व समाजासाठी समानतेने काम करणारे नेतृत्व म्हणून 'दादा' अशी ओळख निर्माण केलेले आमदार प्रशांत ठाकूर हे मोठ्या मनाचे व संवेदनशील नेतृत्व मानले जाते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या योजनांमुळे अनेक कुटुंबांना दिलासा मिळाला असून स्वयंरोजगार, शिक्षण, आरोग्य व सामाजिक विकासाच्या दिशेने मतदारसंघात सकारात्मक बदल घडला आहे. यापुढील काळातही या तसेच इतर नव्या लोकहितकारी योजना आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून सुरू राहतील, असा विश्वास अविनाश कोळी यांनी व्यक्त करत सर्वसामान्यांच्या समस्या समजून घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करणाऱ्या या नेतृत्वाबद्दल देण्यात येणारे आभार अपुरेच आहेत असे नमूद केले. सामाजिक बांधिलकी जपत, सर्व समाजघटकांना सोबत घेऊन विकासाचा मार्ग अवलंबणारे आमदार प्रशांत ठाकूर यांचे कार्य पनवेल विधानसभा मतदारसंघासाठी दिशादर्शक ठरत आहे. त्यामुळे ते सर्वांचे लाडके प्रशांतदादा असून भगिनी लाडक्या प्रशांतदादांना धन्यवाद देत आहेत, असेही ते म्हणाले.

या वेळी माजी महापौर कविता चौतमोल यांचेही भाषण झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे यांनी केले, तर आभार पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव यांनी मानले.

***महिलांच्या स्वयंरोजगार उपक्रमात सातत्य***

ग्रामीण भाग आणि त्यानंतर आज शहरी भागातील लाभार्थींना वाटप सुरू झाले. त्यापुढील टप्प्यात कळंबोली, कामोठे व खारघर येथील लाभार्थींना यंत्रसामुग्रीचे वाटप होणार आहे. या उपक्रमामुळे पनवेल मतदारसंघातील अनेक महिलांना घरगुती उद्योग सुरू करण्याची संधी मिळाली असून शिलाई, पीठ गिरणी तसेच इतर पूरक व्यवसायांद्वारे महिलांना स्थिर उत्पन्नाचा मार्ग उपलब्ध झाला आहे. स्वयंरोजगाराच्या माध्यमातून महिलांनी कुटुंबाच्या आर्थिक उन्नतीस हातभार लावावा हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी यापूर्वी स्पष्ट केले होते. महिलांनी मिळालेल्या यंत्रसामग्रीचा योग्य व सातत्यपूर्ण वापर करून आपला व्यवसाय वृद्धिंगत करावा, असे आवाहन या वेळी करण्यात आले.

शासन स्तरावर यंत्रसामग्रीच्या वापराचे सर्वेक्षण करण्यात येणार असून स्वयंरोजगारात विशेष प्रगती करणाऱ्या महिलांना प्रोत्साहन देण्यात येणार असल्याची माहितीही या वेळी देण्यात आली. या योजनेमुळे पनवेल विधानसभा मतदारसंघातील महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले असून भविष्यात उपलब्ध निधीनुसार या उपक्रमाचा पुढील टप्पाही राबविण्यात येणार आहे. उर्वरित लाभार्थ्यांना आज वाटप पूर्ण झाल्याने महिलांकडून समाधान व्यक्त करण्यात येत असून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या या उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात येत आहे.

## पत्रकार संघाचे विश्रामधाम कौटुंबिक जिव्हाळा जपेल –लोकनेते रामशेठ ठाकूर

येत्या मार्चपर्यंत हे अद्ययावत विश्रामधाम उभे राहील, असे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी सांगितले. पत्रकार संघाच्या या भिंतींनी गेली ५० वर्षे अनेक जिव्हाळ्याच्या आठवणी जतन करून ठेवल्या आहेत आणि म्हणूनच हा जिव्हाळा जपून या विश्रामधामाचे नूतनीकरण केले जाईल, असेही चव्हाण म्हणाले.

पत्रकारांच्या या विश्रामधामाच्या उभारणीत अनेकांचे श्रम आहेत. मीही अनेक सामाजिक संस्थात लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या पावलावर पाऊल ठेवून चालण्याचा प्रयत्न करतो. माझ्यातर्फे मी पाच लाखाची देणगी तर पत्रकार संघाला देत आहेच, पण भविष्यातही पत्रकार संघासोबत कायम जोडला जाईन, असे कामगार नेते महेंद्र घरत यांनी म्हटले.

या वास्तूच्या उभारणीसाठी पत्रकार संघाच्या तत्कालीन कार्यकरिणी सदस्यांनी खूप हाल अपेष्टा सोसल्या. त्या सगळ्यांच्या वतीने मी आज हा सत्कार स्वीकारत असल्याची कृतज्ञ भावना माजी अध्यक्ष कुमार कदम यांनी व्यक्त केली.

पत्रकार संघात वैविध्यपूर्ण उपक्रम राबवत असतानाच विश्रामधाम नूतनीकरणाचे शिवधनुष्य आम्ही उचलले आहे. सर्व कार्यकारिणी आणि विश्वस्तांचे आम्ही त्यासाठी आभारी आहोत, अशी भावना कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात कार्यवाह शैलेंद्र शिर्के यांनी व्यक्त केली. निवेदन उपाध्यक्ष स्वाती घोसाळकर यांनी केले.

मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे ६४व्या राज्य नाट्य स्पर्धेत सहभागी झालेले कलावंत देवदास मटाले, स्वाती घोसाळकर, रश्मी महांबरे, प्रशांत चिडे, सिद्धेश शिगवण, सुरेश ठुकरूल आणि दिग्दर्शक गुरुदत्त लाड यांचा विशेष सत्कार या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर आणि कामगार नेते महेंद्र घरत यांच्या हस्ते करण्यात आला.

# पनवेलच्या चेरवलीवाडीत बालविवाह रोखण्यात यश; पोलिसांकडून समुपदेशन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलिसांच्या तत्परतेमुळे पोलीस ठाणे हद्दीतील चेरवलीवाडीत होणारा एक बालविवाह रोखण्यास त्यांना यश आले आहे.

पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील चेरवलीवाडी तालुका पनवेल जिल्हा रायगड या गावात कातकरी कुटुंबीयात बालविवाह होणार असल्याची गोपनीय बातमीची शहानिशा करण्यासाठी जिल्हा महिला व बालविकास कार्यालय अंतर्गत चाइल्ड हेल्पलाइन १०९८ चे जिल्हा प्रकल्प समन्वक प्रकाश नामदेवराव पवार यांनी पनवेल पोलीस ठाण्यात पोलीस मदत मागितली होती. वरिष्ठ पोलिस निरिक्षक गजानन घाडगे यांच्या आदेशान्वये सहाय्यक पो निरिक्षक कुदळे, पोहवा होल्गीर, व पीसी चालक अमरजीत गायकवाड असे चेरवलीवाडी या ठिकाणी गेले.

बालविवाह होणार्या मुलीच्या वयाबाबत जिल्हा परिषद शाळा चेरवली वाडी येथून जन्मतारखेबाबत खात्री केली असता मुलीचे वय १४ वर्ष सहा महिने असल्याचे निदर्शनास आले.

वाजे ग्रामपंचायतचे ग्रामपंचायत अधिकारी हेमंत शिवराम राठोड, पोलीस पाटील सुमित रघुनाथ पाटील, सरपंच भारती भालेकर, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पथक व समन्वयक अधिकारी असे चेरवली वाडी या ठिकाणी जाऊन कातकरी कुटुंबीयात होणारा बाल विवाह रोखण्याबाबत त्यांना बालविवाह बाबत माहिती देऊन त्यांचे समुपदेशन केले

अल्पवयीन मुलामुलीच्या पुढील भविष्याच्या वाटचाली करता त्यांना बालकल्याण समिती कर्जत जिल्हा रायगड यांच्या समक्ष हजर ठेवले. तसेच कातकरी कुटुंबीयांना व गावातील प्रतिष्ठित लोकांना पोलिस ठाण्यास आणून वरिष्ठ पोलिस निरिक्षक गजानन घाडगे व इतर अधिकारी यांच्या समवेत त्यांची बैठक घेवून बालविवाह रोखण्याबाबत समुपदेशन करण्यात आले आहे.

# सौदी बँकेच्या नोटा देतो सांगून चार लाखांची फसवणूक

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

सौदी बँकेच्या ५० रियाल चलनाच्या २०० नोटा देतो असे सांगून चार लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी शब्बीर, अनोळखी महिला आणि सद्दाम यांच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात सात डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

इम्तियाज अन्सारी हे सेक्टर १७, उलवे येथे राहत असून शब्बीर (रा. कळंबोली) याने अन्सारी यांच्या नातेवाईकांना सौदी बँकेच्या नोटा असल्याचे सांगितले आणि त्या नोटा भारतीय चलनात परिवर्तन केल्यास एक रियल चलनामागे भारतीय चलनाचा पाच रुपये फायदा होईल असे ५० रियाल नोटांच्या एकूण २०० नोटांचे पन्नास हजार रुपयांचा फायदा होईल असे सांगितले.

यावेळी शब्बीर याने ५० रियालची नोट दाखवली. नोट एक्सचेंज करून त्या बदल्यात एक हजार रुपये देखील घेतले. त्यामुळे आपला फायदा होईल असे अन्सारी याना वाटले. त्यानंतर शब्बीर एका महिलेच्या घरी जाऊन पिशवी घेऊन आला आणि नोटा दाखवल्या.

अन्सारी याने चार लाख रुपये शब्बीर याच्यासोबतच्या महिलेला दिले आणि त्यांनी रियाल चलन असलेली पिशवी दिली. आणि ते तिथून निघून गेले. अन्सारी यांनी पिशवी उघडून पाहिली असता त्यात न्युजपेपर रोल करून ठेवलेले आणि रियाल चलनाच्या नोटा ५० रियालच्या तीन नोटा मिळून आल्या. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर इम्तियाज अन्सारी यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.कळंबोली पोलिस तिन्ही संशयीतांचा शोध घेत आहेत

## निवडक

### सोन्याच्या चेनची चोरी

**पनवेल :** सोन्याच्या चेनची चोरी केल्याप्रकरणी खारघर पोलिस ठाण्यात कारचालक, पूर्वीचा चालक, बॉडीगार्ड व घरकाम करणाऱ्या महिलेविरोधात १३ लाख २० हजारच्या दागिन्याची चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे .प्रणाली अहिरे या सेक्टर १०, खारघर येथे राहत असून, त्या आईसह बाली, इंडोनेशिया येथे निघाले. त्यावेळी त्यांचे वडील गावी होते. त्यानंतर ते घरी पोहोचले. या वेळी कपाटातील सोन्याची चेन सापडली नाही. सीसीटीव्ही फुटेज तपासले असता त्यांच्या चालक, पूर्वीचा चालक, बॉडीगार्ड व घरकाम करणारी महिला हे बेडरूममध्ये आल्याचे दिसून आले.

### कारच्या धडकेने वकील जखमी

**पनवेल :** रस्ता क्रॉस करत असताना कारने धडक दिल्याने २८ वर्षीय वकील जखमी झाले. या अपघातप्रकरणी पनवेल शहर पोलिस ठाण्यात अनोळखी कारचालकावर गुन्हा दाखल झाला आहे सिद्धेश शंकर साखरे हे कशेळे, कर्जत येथे राहत असून ते पनवेल कोर्टात आले होते. ते मित्रांसह पायी घरी जात असताना सातच्या सुमारास आशियाना सोसायटीच्या समोरील रस्त्यावरून रस्ता क्रॉस करत होते. पनवेल कोर्टाकडून वडाळे तलावाच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव कारचालकाने त्यांना धडक दिली. यात खाली पडून ते जखमी झाले.

### टँकरच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** पाण्याच्या टँकरने स्कूटीला धडक दिल्याने २१ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. या अपघात प्रकरणी तळोजा पोलिस ठाण्यात टँकरचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. अमीर शेख (रा. तळोजा) हा स्कूटी घेऊन घरी परत येत होता. पेंधर फाटा रेल्वे पटरीच्या पुढे तळोजा फैज २ कडे जाणाऱ्या मार्गावर समोरून आलेल्या पाणी टँकरने स्कूटीला जोरदार धडक दिली. त्याच्यावर उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला.

# लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयात विज्ञान प्रदर्शन व रांगोळी स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या वाढदिवसानिमित्त रयत गुरुकुल प्रकल्प अंतर्गत विद्यालयामध्ये शालेय विज्ञान प्रदर्शन व वैज्ञानिक रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या नाविन्यपूर्ण विचारांना संधी देण्याच्या उद्देशाने लहान गट इयत्ता पाचवी ते सातवीआणि मोठा गट आठवी ते दहावी . या दोन गटात स्पर्धा घेण्यात आल्या. या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन प्रसंगी रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कामोठे येथील मुख्याध्यापक देवेंद्र परांजपे, ज्येष्ठ शिक्षक सत्यवान काणेकर, शंकराव चव्हाण विद्यालयाचे उपशिक्षक संजय टोणगे, विद्यालयाचे स्थानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष व ज्येष्ठ स्कूल कमिटी सदस्य जयदास गोवारी , विद्यालयाचे माजी चेअरमन स्वामी आप्पा म्हात्रे, विद्यालयाचे मुख्याध्यापक कोंगेरे एम.के. ज्येष्ठ शिक्षक गावंड आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविकात विद्यालयाचे मुख्याध्यापक यांनी भविष्यातील येणाऱ्या अडचणी वरती मात करण्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान किती महत्त्वाचे आहे हे सांगितले. स्वामी आप्पा म्हात्रे यांनी वैज्ञानिक रांगोळी व विद्यार्थ्यांचे प्रकल्पाचे कौतुक करून विद्यालयातून मोठे वैज्ञानिक तयार होतील ही आशा व्यक्त केली. या शालेय विज्ञान प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी आरोग्य, शेती, कचरा व्यवस्थापन, जल संवर्धन ,संगणकीय विचार या उप विषयांवर विद्यार्थ्यांनी प्रकल्प सादर केले. तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या अध्ययनातील भौतिक, रसायन व जीवशास्त्र, गणित या विषयातील आकृत्या रांगोळीच्या साह्याने काढल्या. शालेय विज्ञान प्रदर्शनाला लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे प्राचार्य अविनाश कुलकर्णी यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांचे प्रोजेक्ट पाहून कौतुक केले.

या सर्व गटातून प्रत्येकी तीन क्रमांक काढून विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.या कार्यक्रमाचे नियोजन विज्ञान विभाग प्रमुख श्रीम.फडतरे गुरुकुल प्रमुख अनिल पाटील, पाटील, एस.डी. पाटील, डी. डी.शिंदे, एस.ए. नलावडे यांनी केले.

# कोस्टल जनजागृतीसाठी पोलिसांची मोटरसायकल रॅली

**पनवेल: वार्ताहर**

पनवेल तालुका पोलिसांनी जनजागृती करण्याच्या उद्देशाने हद्दीमध्ये मोटर सायकल रॅलीचे आयोजन केले होते .

वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनखाली पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील केळवणे जे टी ते केळवणे गाव, बस स्टॉप, शाळा येथे मोटर सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते .सदर मोटर सायकल रॅलीमध्ये कोस्टल सेक्युरिटी हेल्पलाइन नंबर १०९३ चे बॅनर व पोस्टर ने जनजागृती करण्यात आलेले आहे. तसेच उपस्थित सागर रक्षक व नागरिक यांना सागरी सुरक्षेच्या अनुषंगाने योग्य त्या सूचना देण्यात आल्या .कासारभट, केळवणे येथे पोलिसांच्या पथकाने भेटी देऊन मार्गदर्शन केले .



# धावपट्टीजवळ गेल्याने मजुरावर गुन्हा

**पनवेल :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळातील इतर प्रकल्पात काम करणाऱ्या एका २५ वर्षीय मजुराने विमानतळ परिसराच्या पूर्व बाजूच्या कुंपणावरून आत उडी मारून विमानतळाच्या धावपट्टी व नियंत्रण कक्षाजवळील परिसरात वावर केला. यामुळे त्याच्यावर थेट पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल केला.

विना परवानगी प्रवेश करून चोरीच्या उद्देशाने विमानतळात प्रवेश केल्याचा ठपका त्या मजुरावर ठेवण्यात आला आहे. सीआयएसएफच्या अधिकाऱ्यांनी तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात नोंदविली.

# ग्रुपमधून काढल्याने पती-पत्नीस मारहाण

**पनवेल :** सोसायटीच्या व्हॉट्सअॅप ग्रुपमधून काढून टाकल्याचा राग मनात धरून मारहाण केल्याप्रकरणी युवराज उत्तम घागरे, अमृत रवींद्र बेलदार, ओमकार मोकल (तिघेही रा. बागेश्री सोसायटी, खारघर) यांच्या विरोधात तळोजा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे . विश्वास धनावडे हे बागेश्री सोसायटी, सेक्टर ४०, खारघर येथे राहत असून त्यांच्या सोसायटीतील आशिष याने अमृत बेलदार व ओमकार मोकल यांना सोसायटीच्या व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये अॅड केले. ते सोसायटीचे सभासद नसल्याने त्यांना धनावडे यांनी ग्रुपमधून काढून टाकले. त्यानंतर त्यांना ओमकार याने फोन करून बिल्डिंगच्या खाली बोलाविले. यावेळी तुम्ही ग्रुपमध्ये गैरसमज पसरवत आहेत व माझ्या नावाची बदनामी करत आहात म्हणून तुम्हाला ग्रुपमधून काढून टाकल्याचे धनावडे यांनी सांगितले. यावेळी अमृतने धनावडे यांना हाताबुक्क्यांनी डोक्यात मारहाण केली तर ओमकार व युवराज यांनी काठीने मारहाण केली. यामुळे दोघांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

# डॉ. नंदकुमार जाधव यांना महात्मा ज्योतिबा फुले नॅशनल सन्मानपदक जाहीर

**पनवेल : वार्ताहर**



:बाबू जगजीवन राम कला, संस्कृती तथा साहित्य अकादमीच्या वतीने दिला जाणारा देशातील प्रतिष्ठित 'महात्मा ज्योतिबा फुले नॅशनल सन्मानपदक' यंदा डॉ. नंदकुमार मारुती जाधव यांना प्रदान करण्यात येणार आहे. राजधानी दिल्ली येथे लवकरच होणाऱ्या राष्ट्रीय सोहळ्यात हा गौरव समारंभ पार पडणार आहे.

डॉ. जाधव यांनी गेली अनेक वर्षे शैक्षणिक, सामाजिक आणि विशेषतः बौद्धिक अक्षम मुलांच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांची विशेष शाळा अनेक मुलांचे आयुष्य घडविण्यासाठी सातत्याने काम करत आहे. शिक्षणासोबतच क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम, स्वावलंबन प्रशिक्षण आणि समाजामध्ये जागृती निर्माण करण्यावर त्यांनी विशेष भर दिला आहे.

या उल्लेखनीय योगदानाची राष्ट्रीय पातळीवर दखल घेऊन अकादमीने त्यांना हा मानाचा सन्मान जाहीर केला आहे. विशेष मुलांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेल्या कार्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडत असल्याचे अकादमीने नमूद केले आहे.हा तिसरा राष्ट्रीय पुरस्कार आहे या अगोदर भारत माता राष्ट्रीय पुरस्कार,राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार केंद्रीय सरकार मिळाला असून मिळणाऱ्या या सन्मानामुळे विशेष शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्यांना प्रेरणा मिळणार आहे

# खारघरमध्ये दाखला वाटप शिबिराचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकुर व आमदार प्रशांत ठाकुर यांच्या संकल्पनेतून, प्रविण स्पोटर्स वेल्फेअर असोसिएनचे अध्यक्ष प्रवीण पाटील यांच्या मार्फत शालेय विदयार्थी व जेष्ठ नागरिकांसाठी डोमासाइल, जेष्ठ नागरीक दाखला,नॉन क्रिमीलेयर, उत्पन्न दाखला अशा विविध प्रमाणपत्रवाटप शिबिराचे आयोजन रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुल, खारघर येथे करण्यात आले. यावेळी सुमारे ८०० पेक्षा अधिक शालेय विद्यार्थी व जेष्ठ नागरीक उपस्थित होते. प्रवीण पाटील, नरेश ठाकूर, दिपक शिंदे, नितेश पाटील, सचिन वास्कर, भूषण पाटील, आंबा पटेल, अजित अडसुले. साधना पवार, निर्मला यादव, शोभा मिश्रा, प्रिया दळवी यांनी शुभेच्छा दिल्या.




# उत्सव हॉटेलला भीषण आग

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल सेक्टर १७ मधील पायल सोसायटी परिसरात असलेल्या उत्सव हॉटेलला अचानक भीषण आग लागली.

आगीची माहिती मिळताच संजीवनी मित्र मंडळाचे समाजसेवक परेश घरत, रिपब्लिकन पार्टी (आठवले गट) पनवेल महापालिकेचे युवक अध्यक्ष अक्षय विकास अहिरे तसेच पंचशील नगर येथील जागरूक नागरिक तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्यात सहभागी झाले.

घटनेनंतर नागरिकांनी त्वरेने अग्निशामक दलाशी संपर्क साधून मदतकार्य सुरू केले. हॉटेलमधील कर्मचारी तसेच पायल सोसायटीतील रहिवाशांना सुरक्षित स्थळी हलवून मोठ्या अनर्थापासून बचाव करण्यात आला. अग्निशामक दलाला आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी स्थानिक नागरिक व समाजसेवकांनी सहकार्य केले. तातडीने दाखवलेल्या सतर्कतेमुळे मोठी हानी टळली.



घटनेनंतर परेश घरत व अक्षय अहिरे यांनी प्रभागातील सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची मागणी केली. त्यांनी प्रभागातील रेसिडेन्शियल ठिकाणी चालणारी कमर्शियल दुकाने व गोडाऊन तातडीने बंद करण्यात यावीत. पूर्वीपासून चालू असलेल्या हॉटेल किंवा आस्थापनांकडे वैध फायर सेफ्टी परवानग्या आहेत का याची तपासणी तात्काळ करावी. अग्नितांडव टाळण्यासाठी आस्थापनांनी कोणत्या प्रकारच्या उपाययोजना केल्या आहेत याचा अहवाल मागवावा. यापुढे अशा घटना घडू नयेत यासाठी उपाययोजना कराव्यात अशी मागणी केली.

# तरुणाईने उत्तम साहित्य आवर्जून वाचावे -डॉ. सुभाष वाघमारे

## सीकेटी महाविद्यालयात साहित्यविषयक व्याख्यान





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संघर्ष स्वीकारणारा माणूस खर्या अर्थाने जीवनात यशस्वी होतो. माणसाच्या जाणिवा, संवेदना यांची अभिव्यक्ती साहित्यामधून होत असते. म्हणूनच आजच्या तरुणाईने उत्तम साहित्याचे आवर्जून वाचन केले पाहिजे, असे आवाहन छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथील मराठी विभाग प्रमुख डॉ. सुभाष वाघमारे यांनी व्याख्यानातून केले. सध्याच्या मोबाईल-इंटरनेटच्या युगात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये साहित्याची गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेजमध्ये मराठी विभाग आणि कला संघटन यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. १३) डॉ. सुभाष वाघमारे यांचे 'साहित्य जीवनास दिशादर्शक' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्या वेळी ते बोलत होते. डॉ. वाघमारे यांनी भारतीय संविधानाची महती सांगून विद्यार्थ्यांना जीवनामध्ये यशप्राप्तीसाठी कानमंत्र दिला. आपल्या साहित्यिक सेवेच्या अनुभवातून अनेक कवितांचे संदर्भ देत त्यांनी विद्यार्थ्यांसोबत मनमोकळा संवाद साधला.

शिक्षणप्रेमी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या चरित्र ग्रंथाचे लेखन सध्या डॉ. वाघमारे करत आहेत. त्या अनुषंगाने त्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनातील संघर्षाचे दाखले देत विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा निर्माण केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कला विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. बी.एस. पाटील यांनी केले. कला संघटनेचे अध्यक्ष आणि मराठी विभाग प्रमुख प्रा. एम.एम. अंबुलगेकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला, तर सूत्रसंचालन आणि आभार मराठी विभागाच्या सहाय्यक प्रा. नम्रता कडू यांनी केले. विद्यार्थ्यांना साहित्य क्षेत्राशी जोडण्यासाठी असेच स्तुत्य उपक्रम महाविद्यालयात सातत्याने आयोजित करण्याचे या वेळी निश्चित करण्यात आले.

# लिमये महाविद्यालयातील इतिहास विभागाची सहल

**कळंबोली : बातमीदार**

शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालयातील इतिहास विभागाची नुकतीच मुरुड दर्शन शैक्षणिक सहल संपन्न झाली. यामध्ये पद्मदुर्ग किल्ला, जंजिरा किल्ला, कोरलाई किल्ला, मुरुड किनारा, काशीद किनारा, खोखरी घुमट, इ. स्थळे पहाण्यात आली. महाविद्यालयातील एफ.वाय., एस.वाय., टी.वाय. बी.ए., एम.ए. व पीएच.डी. करत असलेल्या विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला. मूरुड किनारा पाहिल्यानंतर विशेष दोन बोटीने पद्मदुर्ग किल्ला पाहण्यात आला. किल्ला बांधण्याचा उद्देश, त्याचे महत्त्व व इतिहास तसेच जंजिरा व कोलाई किल्ल्याचा इतिहास, त्याची वैशिष्टे डॉ. जाधव बी. बी. सर व डॉ. शिंदे स्वाती मॅडम यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.




या सहलीचा उद्देश आयोजक व इतिहास विभागप्रमुख प्रा. (डॉ.) जाधव बी. बी. यांनी असा सांगितला की, मुंबई विद्यापीठाअंतर्गत महाविद्यालयांनी एन.इ.पी. २०२० स्वीकारली असल्याने त्या अनुषंगाने इतिहास विषयाच्या अभ्यासक्रमात या शैक्षणिक सहलीला महत्त्व आहे. त्या अनुषंगाने फील्ड प्रोजेक्ट, संशोधन पेपर, संशोधन प्रकल्प तयार करण्यासाठी तसेच कौशल्य विकास कोर्समधे अनुभवाधिष्ठित ज्ञान मिळण्यासाठी शैक्षणिक सहलींची आवश्यकता आहे.

हे ज्ञान मिळाल्याने विद्यार्थ्यांची संशोधन वृत्ती व रोजगाराच्या नवीन दिशा याची माहिती होण्यासाठी मदत होते. पर्यटन उद्योगाला चालना मिळते. आपला स्थानिक इतिहास माहिती होऊन समाजप्रेम, देशप्रेम व महापुरुषांच्या बद्दल आदर निर्माण होतो. आपला वारसा व त्याचे जतन करणे ही सामूहिक जबाबदारी विद्यार्थ्यांच्यामध्ये निर्माण होते.

पद्मदुर्ग किल्ला पाहण्यासाठी विशेष बोट करावी लागते. पद्मदुर्ग किल्ला व जंजिरा किल्ला विद्यार्थ्यांना दाखवताना समुद्रातून प्रवास करण्यासाठी बोटीची सुरक्षितता लक्षात घेणे आवश्यक असते. भरती - ओहोटीची वेळ लक्षात घेऊन स्थानिकांच्या मार्गदर्शनानुसार काळजी घेणे आवश्यक असते. हा निसर्गरम्य किनारा विद्यार्थ्यांना आवडतो.

# दे मार घे मार.... पब्लिक खुश, थिएटर हाऊसफुल्ल!

पुष्पा, कांतारा, ॲनिमल, पठाण, पुष्पा २, धुरंदर.... हातापायाने भरपूर उलटसुलट मारामारी झाली रे झाली की आधुनिक, अत्याधुनिक शस्त्रांचा भरपूर वापर, गैरवापर, त्यात व्हीएफएक्स आणि एआय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून तीच मारधाड आणखी कडक. जोरदार, मारणारा आणि मार खाणारा यांची क्षमता एकदमच भारी. न थकणारी. पिक्चरचे भारी बजेट ठरवतानाच त्यात जमिनीवरील, हवेतील, कधी बोटीतील तर कधी कॅम्पुटरने जोरदार मारधाड. अगदी छावा ऐतिहासिक चित्रपट असला तरी त्यात केवढे तरी क्रौर्य आणि हिंसा खचाखच भरलेली.










या सगळ्यात विशेष उल्लेखनीय गोष्ट हे सगळे चित्रपट लोकप्रिय ठरले, उत्पन्नाचे नवीन विक्रम केले. काहीचे मोठ्या शहरात खेळ वाढवावे लागले, मिडनाईट मॅटीनी शो सुरू झाले, त्यांनाही ऑनलाईन भारी बुकिंग हे खेळ पहाटेला संपतात, चोवीस तास मनोरंजन म्हणतात ते हेच. या सगळ्याच चित्रपटांची लांबी तब्बल तीन, साडेतीन तास आणि अशा लांबलचक चित्रपटात गोष्ट एवढी छोटीशी, पण सर्व प्रकारचा मनोरंजनाचा मसाला पिक्चरभर. प्रणय, नातेसंबंध, थोडं इमोशन, एखादा विनोद. गीत संगीत आणि नृत्य, जमल्यास एखाद्या सणाचे गीत नृत्य, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अनेक दृश्ये, महागड्या गाड्या, थरारक पाठलाग दृश्ये, भलते सलते साहस, जोरदार शोरदार डायलॉगबाजी या सगळ्याचे पॅकेज म्हणजे हे पारंपरिक मसालेदार मनोरंजन चित्रपट आणि या चित्रपटांच्या तिकीट दरात वाढ. 'धुरंधर'साठी मोठ्या शहरातील चकाचक मल्टीप्लेक्समध्ये चक्क बावीसशे रूपेरी तिकीट. ते सिनेमा पाहण्यासाठी की मल्टीप्लेक्सच्या गुलाबी चेअरवर आराम करण्यासाठी हे विचारायचे नाही. चित्रपटाच्या एका तिकीटासाठी दोन हजार दोनशे रुपये खर्च करण्याची ऐपत असलेला नवश्रीमंत व उच्चभ्रू चित्रपट रसिक आहे हे दिसून येते.

कार्पोरेट युगात चित्रपट हे सर्वसामान्य, स्वप्नाळू, आशावादी वर्गाचे माध्यम, आवड आणि व्यवसाय राहिलेला नाही हे वेगळे सांगायला नकोच. या डिजिटल पिढीला पडदाभर ढिश्यूम ढिश्यूम का बरे आवडत असावी? व्हिडीओ गेम, कॅम्पुटर गेम यामुळेच पिक्चरभर साहसी दृष्ये आवडत असावी असे वाटते तरी आणि या प्रचंड साहसी दृष्यासह येणारा प्रचंड रक्तस्त्राव, रक्तपात पाहण्यासाठी नजर तयार झाली आहे असे दिसतेय.

चित्रपटाच्या जगात यश म्हणजेच सबकुछ आहे. त्यामुळे सुपरहिट ठरलेल्या चित्रपटातील फॉर्म्युला वापरणं हे तर ठरलेले. असाच भरपूर हिंसाचार खचाखच भरलेल्या चित्रपटात दिग्दर्शकाला काम ते किती? स्टंट दिग्दर्शक आणि त्याची बळकट शरीरयष्टी असणारी टोळीच हे सगळे घडवते.

कृष्ण धवल अर्थात ब्लॅक ॲण्ड व्हाईट चित्रपटाच्या काळात आणि अगदी चित्रपट रंग घेऊन येऊ लागला तरी 'पिक्चरच्या अगदी शेवटी' ढिश्यूम ढिश्यूम फायटिंग होऊन पोलिसांची एन्ट्री होऊन व्हीलनला अटक होई नि हीरो आपल्या ओठाला लागलेले रक्त पुसल्यावर पडद्यावर 'द एन्ड' येई, अशा परंपरेला धक्का बसला आणि गब्बरसिंगची पोस्टरपासून पडद्यापर्यंतची दहशत पब्लिकला आवडली. रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले'ने मुंबईत मिनर्व्हा थेटरात चक्क पाच वर्ष हाऊसफुल्ल मुक्काम करावा हे आश्चर्याचं होतं आणि आता संदीपा रेड्डी वांगा दिग्दर्शित 'निमल'च्या रणविजयच्या अतिशय क्रूरतेला रसिकांची तुफान लोकप्रियता मिळाली यातही तसाच धक्का होता. आदित्य धर दिग्दर्शित 'धुरंदर' ही असाच गाजतोय आणि त्याचा असाच हिंसक पुढचा भाग मार्चमध्ये प्रदर्शित होतोय. रूपेरी पडद्यावरील हिंसेचे समर्थन अशीच ही वेगळीच परंपरा. आज कॅमेरातंत्र आणि मंत्र आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रगत झाले आहे आणि संकलनही तांत्रिक प्रगतीने प्रभावी ठरत आहे. हे हिंसाचारी दृश्याना पूरक ठरलेय.

'शोले' ( १९७५)च्या वेळी मला आठवतंय तात्कालिक समीक्षकांनी त्यात 'प्रचंड हिंसा आहे' अशी शेरेबाजी केली तरी 'पब्लिकच्या मनात काही वेगळेच होते.' त्यांनी पिक्चर असा काही डोक्यात आणि डोक्यावर घेतला की रसिकांची पिढी बदलत राहिली तरी पन्नास वर्षांनंतरही 'शोले' चर्चेत आहे. त्याने पेरले ते फारच वा नको तेवढे उगवतेय. फरक इतकाच कालांतराने गब्बरसिंगचे आकर्षण वाटू लागले. हा डाकूपट सूडकथाच. हिंसेने खचाखच भरलेली. आता तर मूळ शेवटासह (क्लायमॅक्स), काही तेव्हा कापलेल्या दृश्यांना भरती करीत आला आहे.

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

'शोले'पूर्वीही चित्रपटात कमी अधिक प्रमाणात हिंसा दिसली. फूल और पत्थर, यकिन, आमने सामने, आदमी और इन्सान, मेरा गांव मेरा देश, प्राण जाये पर वचन न जाये, धडकन, जंजीर, हीरा, धर्मा , दीवार, धर्मात्मा अशी अनेक उदाहरणे आहेत. 'शोले'ने ॲक्शनला एक प्रकारे प्रतिष्ठा दिली. चित्रपटासाठी स्वतंत्र ॲक्शन दिग्दर्शक असणे आवश्यक ठरु लागले. लूटूपुटीच्या मारामारीची जागा शस्त्रसज्ज क्शनने घेतली. दिलीपकुमारनेही 'विधाता'मध्ये ॲन्ग्री ओल्ड मॅन साकारला. देव आनंदही 'लूटमार सारखा मारधाड चित्रपट दिग्दर्शित करू लागला. हे आपल्या मूळ प्रकृती आणि प्रतिमेपासून खूपच बदलले. ती त्यांची बदलत्या काळाची गरज ठरली. त्यांच्या चाहत्यांना हे न रुचणारे, पण त्यांनी स्वीकारलेले आणि पडद्यावर साकारलेले. विजय आनंद दिग्दर्शित 'जॉनी मेरा नाम' (१९७०)मध्ये देव आनंद पिस्तूल घेऊन छान रमला.

प्रेक्षकांनी रूपेरी पडद्यावरील हिंसा का आवडते याला उत्तर नाही. आणि आता तर फारच आवडतेय. आजूबाजूच्या वातावरणाचा परिणाम असावा का हा? आज लहान सहान कारणांवरून भांडणं होताहेत, माणसाचा संयम सुटतोय. तो समोरच्यावर हात उगारतोय आणि हेच एक कारण आज पडद्याभरची मारधाड आवडणारे असावे का?

'मेरी आवाज सुनो'मध्येही अतिशय दाहकता होती. नायकाला (जितेंद्र) खुर्चीला घट्ट बांधले असून त्याच्या डोळ्यासमोर त्याच्या पत्नीवर (हेमा मालिनी) खलनायक (कादर खान) अतिशय क्रूरपणे जबरदस्ती करतो. या हिंसेवर प्रचंड टीका झाल्याने सेन्सॉर हे दृश्य कापणार, इतकेच नव्हे तर या चित्रपटावरच बंदी येणार अशी 'ब्रेकिंग न्यूज' पसरल्यावर अनेक शहरांत या चित्रपटाचे शोज वाढले. ते हाऊसफुल्ल झाले.

पुन्हा तोच प्रश्न, सामूहिक गर्दीने पडद्यावरील हिंसा अतिशय आवडीने पाहण्याच्या मानसिकतेला काय म्हणायचे?

नव्वदच्या दशकात 'नायक नहीं खलनायक हू मै' असा एक फंडा आला. हा 'खलनायक' क्रूरच. हिसक मनोवृत्तीच्या. संयम नसलेला. 'हारकर भी जितनेवालों को बाजीगर कहते है' हीदेखील हिंसक मनोवृत्तीच. हा 'बाजीगर' आपल्या पित्यावरील अन्यायाचा बदला म्हणून आपल्या पहिल्या प्रेयसीला गच्चीतून ढकलतो आणि जणू काही घडलचं नाही असं मानतच तो रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या प्रेयसीभोवतीच्या गर्दीच्या बाजूने शांतपणे निघून जातो. अशा अतिशय क्रूर बुद्धीवत्तेच्या नायकाला चक्क थेटरात टाळ्या शिट्ट्या पडल्याचे आश्चर्य वाटले. प्रेक्षक बदलत गेला का? १९९३चा हा चित्रपट आहे. म्हणजेच क्रूर नायक आवडणे तसे तीन दशके जुने. 'डर'मधील क... क... किरण हा शाहरूख खानचा धाक चक्क लोकप्रिय झाला. त्याने चित्रपटातील नायकावर (सनी देओल) मात केली. तो स्टार झाला.

पुन्हा तोच प्रश्न, प्रेक्षकांना हिंसेचे असं आणि इतकं आकर्षण का? गॅन्गस्टर नायक, अंडरवर्ल्ड यात माईंड गेम, थंडपणे शस्त्र चालवणे, खून खराबा, शहरावर आपलचं वर्चस्व असावे म्हणून कुठेही गोळीबार आणि हिंसा. यावर अनेक चित्रपट येत राहिले. 'परिंदा', 'सत्या', 'हत्यार', 'जुल्म की हुकुमत', 'कंपनी', 'अंगारे', 'वास्तव', 'शूट आऊट लोखंडवाला ' मुंबई गॅन्गवॉर' वगैरे वगैरे. या थीमवरचे अनेक चित्रपट यशस्वी ठरले. टोळीयुद्ध नि गोळीयुद्ध पहावेसे वाटले.

चित्रपट किती चालला, त्याने किती कमावले याहीपेक्षाही मोठा प्रश्न क्रूरतेला इतके अतिशय आवडीने का पाहिले जाते?

आजचे जग विज्ञान युग आहे. तर जगणं स्पर्धात्मक आणि वेगवान आहे. नातेसंबंधापेक्षा पैसा महत्त्वाचा फंडा झाला आहे. शहरी जीवनात वेगाची नशा आहे.

अशातच रूपेरी पडद्यावर, ओटीटीवर काही हिंसक वा क्रूर पाहणे ही मानसिक वा बौद्धिक गरज का बरे झाली असावी? पडद्यावरील हीरोशी आपण जोडले जावे ही आपल्याकडील प्रेक्षक संस्कृती आहे. अशी रूपेरी पडद्यावरील हिंसा त्याना आवडतेय यात काही मानसशास्त्रीय प्रश्न दडलाय का? चित्रपटावर 'फोकस' टाकताना त्याचं अवाढव्य बजेट, जवळपास जगभरातील प्रदर्शन, मीडया हाईप, त्याची थीम, त्यातील स्टार, त्याची झटपट कमाईचा अबब म्हणावा असा मोठासा आकडा, त्यावरच्या उलटसुलट प्रतिक्रिया, गॉसिप्स, ग्लॅमर, झगमगाटी प्रीमियर, सोशल मीडियातील कव्हरेज, रिल्स यापलिकडे जात बरेच काही आहेच आहे.

चित्रपटातील हिंसा वा क्रूरतेचे आकर्षण हा सामाजिक चिंतेचा विषय आहे का हो? तुम्हीही विचार करा, तुम्हाला रूपेरी पडद्यावरील ही वेळोवेळी आलेली हिंसा का आवडतेय? कदाचित तुम्हाला ती आवडली नसेलही, पण मग अनेक प्रेक्षकांना मात्र ते आवडतयं ते का असावे? मल्टीप्लेक्सच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर असलेल्या साऊंड सिस्टीममध्ये तर हा हिंसाचार आणखी रोमांचक आणि थरारक अनुभव देतोय. ही एक भारी सपोर्ट सिस्टीमच आहे. साठच्या दशकातील पिक्चर्समधील मारामारी पाहताना तोंडाने ढिश्यूम ढिश्यूम केले जातेय की काय असे वाटे. पब्लिकही टाळ्या शिट्यांनी हिरोला प्रोत्साहन देत असे.

आज घरबसल्या ओटीटीवर जगभरातील अनेक भाषेतील चित्रपट आणि वेबसिरीज पहायला मिळताहेत, त्यात खचाखच हिंसा आणि नग्नता, अर्धनग्नता आहे. कधी ती बिभत्सही वाटते. वेबसिरीजला सेन्सॉर बोर्ड नसल्याने फारच मोकळीक मिळाली आहे. त्यात बेभान, बेफाम मारधाड ॲक्शन एन्जॉय करण्याच्या सवयीतूनच आज चित्रपटातील हिंसाचार आवडत असावा. पॅन इंडिया चित्रपटाचे ते एक मोठेच देणं म्हणायचे.

# महाराष्ट्राचे आधुनिक वाल्मिकी 'गदिमा'

विख्यात मराठी कवी व पटकथा–संवाद–लेखक म्हणजे 'गदिमा' अर्थात गजानन दिगंबर माडगूळकर. त्यांचा आज स्मृतिदिन. जन्म १ ऑक्टोबर १९१९ रोजी शेटेफळ (सांगली) या गावचा. शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे. गणित विषयामुळे मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण होऊ शकले नाहीत. पुढे घरच्या गरीबीमुळे चरितार्थासाठी चित्रपट व्यवसायात आले.



'गदिमा' यांना लहानपणापासून लिहिण्याची, नकला करण्याची आवड होती. तिचा येथे उपयोग झाला. 'हंस पिक्चर्स' चित्रसंस्थेच्या, मा. विनायक दिग्दर्शित ब्रह्मचारी (१९३८) या गाजलेल्या चित्रपटात काही छोट्या भूमिका करून माडगूळकरांनी आपल्या चित्रपटक्षेत्रातील कारकीर्दीचा आरंभ केला. सुप्रसिद्ध साहित्यिक वि.स. खांडेकर यांचे लेखनिक म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले.

नवयुग चित्रपट लि. चित्रसंस्थेत के. नारायण काळे यांच्या हाताखाली सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम करण्याची संधी माडगूळकरांना मिळाली, तेव्हा चित्रकथेची चित्रणप्रत कशी तयार करतात हे त्यांना अगदी जवळून पहावयास मिळाले तसेच आचार्य अत्रे यांच्या सोप्या, पण प्रासादिक गीतरचनेचा आदर्श त्यांच्या समोर राहिला. पुढे नवहंस पिक्चर्सच्या भक्त दामाजी (१९४२) आणि पहिला पाळणा (१९४२) या चित्रपटांची गीते लिहिण्याची संधी मिळाली. नंतर राजकमल पिक्चर्सच्या लोकशाहीर रामजोशी (१९४७) या चित्रपटाची कथा–संवाद आणि गीते त्यांनी लिहिली. त्यात एक भूमिकाही केली.

गीतकार, कथासंवादकार आणि अभिनेते म्हणून दीडशेहून अधिक मराठी आणि कथासंवादकार म्हणून पंधरा हिंदी चित्रपटांसाठी माडगूळकर यांनी काम केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेली गीते चैत्रबन (१९६२) या नावाने संग्रहित आहेत तसेच काही मराठी चित्रकथाही पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेल्या आहेत (तीन चित्रकथा, १९६३). युद्धाच्या सावल्या (प्रयोग, १९४४) या नावाचे एक नाटक त्यांनी लिहिले होते. त्यांच्या उल्लेखनीय पुस्तकांपैकी काही कविता–जोगिया (१९५६), चार संगीतिका (१९५६), काव्यकथा (१९६२), गीत रामायण (१९५७), गीत गोपाल (१९६७), गीत सौभद्र (१९६८). कथासंग्रह–कृष्णाची करंगळी (१९६२), तुपाचा नंदादीप (१९६६), चंदनी उदबत्ती (१९६७). कादंबरी–आकाशाची फळे (१९६०). आत्मचरित्रपर–मंतरलेले दिवस (१९६२) आणि वाटेवरल्या सावल्या (१९८१) ही आहेत.

माडगूळकरांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, सोप्या परंतु प्रभावी गीतांतूनही येतो. त्यांच्या कवितेतील अस्सल मराठमोळेपणामागेही हेच संस्कार उभे असल्याचे दिसते. त्याचप्रमाणे लोकगीतांच्या लोभस लयतालांनी त्यांची गीते नटलेली असत. उत्तम समरगीते आणि बालगीतेही त्यांनी लिहिली. मराठी रसिकांनी माडगूळकरांच्या काव्यरचनेला मनःपूर्वक प्रतिसाद दिला आणि त्यांच्या गीत रामायणाने तर कीर्तीचा कळस गाठला त्यांना 'महाराष्ट्र–वाल्मिकी' ही सन्माननीय पदवी लोकांनी स्वयंस्फूर्तीने दिली. गीतरामायणाच्या गायनाचे शेकडो कार्यक्रम झाले व अजूनही होत आहेत. अन्य भारतीय भाषांत अनुवादही झाले.

माडगूळकरांच्या चित्रकथा वैविध्यपूर्ण असून त्यांचे संवाद सोपे, पण प्रत्ययकारी आहेत. चित्रपटतंत्राची त्यांची अत्यंत सूक्ष्म जाण त्यांतून लक्षात येते. त्यांनी लिहिलेल्या आणि विशेष गाजलेल्या चित्रपटांत पुढचं पाऊल (पटकथा, संवाद, गीते १९५०), बाळा जो जो रे (१९५१), लाखाची गोष्ट (१९५२), पेडगावचे शहाणे (१९५२), ऊन पाऊस (१९५४), मी तुळस तुझ्या अंगणी (१९५५), जगाच्या पाठीवर (१९६०), संथ वाहते कृष्णामाई (१९६७) यांचा समावेश होतो. (कथा, पटकथा, संवाद, गीते त्यांपैकी सर्व वा काही), तर तुफान और दिया (१९५६), दो आँखे बारह हाथ (१९५७), गूँज उठी शहनाई (१९५९) हे त्यांनी लिहिलेले उल्लेखनीय हिंदी चित्रपट आहेत.


माडगूळकर हे उत्तम चरित्र अभिनेतेही होते. पुढचं पाऊल, लाखाची गोष्ट, पेडगावचे शहाणे, वऱ्हाडी आणि वाजंत्री (१९७३) या चित्रपटांत त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरलेल्या आहेत.

माडगूळकरांच्या जोगिया, मंतरलेले दिवस, चैत्रबन इ. अनेक पुस्तकांना महाराष्ट्र शासनाची पारितोषिके मिळाली. भारत सरकारने पद्मश्री देऊन (१९६९) त्यांचा सन्मान केला. १९७३मध्ये यवतमाळ येथे भरलेल्या मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपद त्यांना देण्यात आले होते. महाराष्ट्र राज्याच्या विधान परिषदेचे ते काही काळ नियुक्त सदस्य होते तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचेही ते सदस्य होते. पुणे येथे ते १४ डिसेंबर १९७७ रोजी निधन पावले.

**–अ.र. कुलकर्णी (मराठी विश्वकोष)**

# योगाचार्य बी.के.एस. अय्यंगार

दरवर्षी २१ जून रोजी जागतिक योग दिवस साजरा करण्यात येतो, पण आपल्याला हे माहीत आहे का की आपले प्राचीन पद्धतीने केलेलं योग, व्यायामाचा या प्रकाराला जगामध्ये कोणी प्रसिद्धी मिळवली आहे?



योगाचार्य बेल्लूर कृष्णमाचार सुंदरराजा अय्यंगार (बी.के.एस. अय्यंगार) हे एक भारतीय योग प्रशिक्षक व लेखक होते, ज्यांनी जागतिक स्तरावर योग सादर केले. त्यांना अय्यंगार योगा या हठ योग पद्धतीचे जनक मानले जाते. भारत तसेच जगभर योगासने लोकप्रिय करण्याचे श्रेय अय्यंगारांना दिले जाते.

कर्नाटकचे बेल्लूरच्या कोलार डिस्ट्रिक्टमध्ये १४ डिसेंबर १९१८ रोजी यांचा जन्म झाला. यांचे वडील श्री कृष्णमाचार आणि आई शेषम्मा होत्या. यांनी अय्यंगार योगा म्हणून एक योगाची स्थापना केली आणि जागतिक स्तरावर योगाला 'व्यायामाच्या एक प्रकार' म्हणून प्रसिद्धी मिळवली.

लहान वयामध्ये ते मलेरिया, टायफॉईड, क्षयरोग (टी.बी), सामान्य कुपोषण अशा आजारांनी ग्रसित होते. १९३४मध्ये त्यांना योगी श्री तिरुमलाई कृष्णमाचार्य (आधुनिक योगाचे जनक) यांनी म्हैसूर येथे बोलावलं आणि योगामध्ये प्रशिक्षित केलं. अय्यंगार म्हणतात दोन वर्षाच्या अभ्यासात योगी तिरुमलाई यांनी फक्त १०–१५ दिवस त्यांना शिकवलं, पण ते १०–१५ दिवस यांचे आयुष्याचे महत्त्वपूर्ण दिवस सिद्ध झाले, ज्यामुळे त्यांची आणि त्यांच्या आयुष्याची कायाच पलटली आणि येथून सुरू झाली होती योगाला जागतिक स्तरावर प्रसिद्धी मिळवायची कहाणी.

योगाचार्य अय्यंगार हे पहिल्यांदा १९५४ साली प्रसिद्ध व्हॉयलीन वादक येहुदी मेनुहिन यांचा आमंत्रणावर स्वीतझरलँड (युरोप) येथे योग शिकवायला गेले होते. त्यानंतर १९५६ साली अमेरिकेचे ॲन अर्बोर, मीशींगेन शेहेरात त्यांना योग शिकवायची संधी मिळाली आणि या प्रकारे ते पहिल्यांदा अमेरिकेत गेले.

अय्यंगार यांनी जय प्रकाश नारायण यांना देखील योग शिकवले, इतकंच नव्हे तर बेल्जियमच्या महाराणी एलिसाबेथ यांना ८०च्या वयात शीर्षासन शिकवले आणि असे किती तरी प्रसिद्ध लोकं आहेत जी यांना खूप मानतात जसे उपन्यासकार ऑलडस हुक्सली, अन्नेट्टे बेनिंग, सचिन तेंडुलकर, करीना कपूर.

वर्ष १९६६ साली अय्यंगार यांनी स्वतःची पहिली पुस्तक लाइट ऑन योगा प्रकाशित केली, ज्याच्यात २००पेक्षा जास्त योगासने आहेत. यांची लाइट ऑन प्राणायाम, लाइट ऑन योगा सूत्रास ऑफ पतंजली, लाइट ऑन लाइफ सारखी अनेक पुस्तके आहे. यांनी वर्ष १९७५मध्ये त्यांच्या अर्धांगिनींच्या स्मरणार्थ रामामनी अय्यंगार मेमोरियल योगा इन्स्टिटयूटची स्थापना पुणे येथे केली.

भारताला जागतिक स्तरावर योगा क्षेत्रात इतका सन्मान आणि ओळख देणारे योगाचार्य बी.के. एस. अय्यंगार यांना भारताचे तीन प्रमुख सन्मान देण्यात आले. अय्यंगारांच्या योगामधील अमूल्य योगदानासाठी भारत सरकारने त्यांना १९९१ साली पद्मश्री, २००२ साली पद्मभूषण, तर २०१४ साली पद्मविभूषण हे पुरस्कार बहाल केले. वर्ष २००४मध्ये यांचे नाव टाइम्स मॅगझिनच्या जगाचे १०० सगळ्यात प्रभावी लोकं म्हणून समाविष्ट करण्यात आले. आज हजारपेक्षा जास्त योग प्रशिक्षक (प्रमाणित अय्यंगार योग शिक्षक) आहेत, त्यातून फक्त युनायटेड स्टेट्समध्ये ११०० इतके आहेत. २० ऑगस्ट २०१४ रोजी पुणे येथे ९५ वयामध्ये यांनी प्राण सोडले. (साभार : वेबदुनिया मराठी)

# शीत लहरीच्या प्रकोपात पशुपालकांनी काय करावे.. करू नये..

सध्या थंडीचे प्रमाण वाढत असून या शीत लहरीच्या प्रकोप्रात शेतकरी व पशुपालक यांच्या पशुधनाचे आर्थिकदृष्ट्या नुकसान होऊ नये यासाठी शीत लहरींपासून पशुधनाचा बचाव करणे आवश्यक आहे. शीत लहरींच्या प्रकोपाच्या तीव्रतेपासून संरक्षण करणे, अनुषंगिक आजार व मर्तुक नियंत्रीत करण्यासाठी कोणत्या उपाययोजना उपयुक्त आहेत याविषयी जाणून घेऊया..

शीत लहरीमध्ये नवजात वासरे, कालवडी, गोऱ्हे, वगारी, रेडझ्रण, मेंढ्या व शेळ्यांचे करडं, आजारी पशुधन तसेच श्वसन संस्थेचे विकार असलेले पशुधन, दुभते पशुधन, अशक्त पशुधन हे उच्चतम जोखीम असलेले पशुधन आहे. शीत लहरीमुळे होणाऱ्या हायपोथर्मिया, फ्रॉस्ट बाईट, भूक मंदावणे, मोठ्या पशुधनात सांधे दुखी, कुत्र्यांच्या पिलात खोकला, श्वसन विकार आदींवर उपाययोजना पुढीलप्रमाणे आहेत.

**काय करावे?**

स्थानिक हवामानाच्या अंदाजाची अद्यावत माहिती ठेवावी. वातावरणातील तीव्र बदलापासून पशुधनाचा बचाव करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांची तयारी करून ठेवावी. थंड वाऱ्यापासून बचाव करण्यासाठी पशुधनाचानिवारा चहू बाजूने आच्छादित करावा, पत्र्याचे छत असल्यास त्यावर वाळलेले गवत अथवा कडब्याचा थर पसरावा तसेच पशुधनास निवाऱ्यातील जमिनीतील थंडीपासून बचावासाठी वाळलेल्या चाऱ्याचा थर/बिछाना अंथरावा. पशुधनाचा निवारा शीत ऋतूत जास्त सूर्यप्रकाश पुरविणारा व उन्हाळ्यात सूर्यकिरणांच्या तीव्रतेपासून बचाव करणारा असावा. कडाक्याची थंडी असल्यास निवाऱ्यात कृत्रिम प्रकाश व उष्णता पुरवायची सोय करावी. अशक्त व आजारी पशुधनास थंडीपासून बचावाकरिता पोती/बारदान यासारखी सोय असावी तसेच रात्री सर्व पशुधन उबदार निवाऱ्यात ठेवावे. पशुधनास ओलाव्यापासून दूर ठेवावे तसेच उष्णतेसाठी शेकोटी पेटविली असेल तर त्यापासून निघणाऱ्या धूरापासून त्यांचा बचाव करावा, ओलसरपणा ओलावा व धूर यामुळे पशुधनास न्युमोनिया होण्याची शक्यता असते.

पशुधनाच्या शरीराचे तापमान नियंत्रित राहावे यासाठी विशेषकरून लहान वयाच्या व अशक्त पशुधनास पेंड व गूळ देण्यात यावे तसेच त्यांना उबदार जागी ठेवण्याची सोय असावी. पशुधनासाठी उच्च दर्जाच्या चारा व पशुखाद्याचा मुबलक साठा असावा. सुधारित पशुपोषण पद्धती व पुरक खाद्य वापरावेत. पशुधनास जंत/कृमीनाशके देण्यात यावे.

पशुधनांचा बाह्यपरजीवी किटकांपासून बचाव करण्यासाठी त्यांच्या निवाऱ्यात स्वच्छता ठेवावी तसेच निरगुडी, तुळस, लेमन ग्रास यांच्या जुड्या गोठ्यात लटकवाव्या, त्या वासाने बाह्य परजीवीं किटक पशुधनाच्या निवाऱ्यात येण्याची शक्यता कमी होते, निवाऱ्याच्या/गोठा स्वच्छतेसाठी कडूनींबाचा तेल असलेले निर्जंतुकीकरण द्रावण वापरता येईल. पशुधनाच्या संवर्गानुसार लाळ खुरकुत, घटसर्प, फऱ्या, पीपीआर, आंत्रविषार, इत्यादी रोग प्रतिबंधक लस देण्यात यावी. पशुखाद्यातून व पाण्यातून पुरेसे क्षार पुरविण्यात यावेत. दुभत्या पशुधनास संतुलित्त आहार व पुरक स्निग्ध खाद्य पुरविण्यात यावेत. पशुधनाच्या पाणी पिण्याची भांडी स्वच्छ असावित तसेच पशुधनास दिवसातुन ४ वेळेस कोमट पाणी पिण्यास द्यावे. सहा महिन्या पुढील गर्भधारणा असलेल्या पशुधनास वाढीव खाद्य द्यावे.

पक्षांच्या पिंजऱ्यांचे तापमान नियंत्रित राहण्याकरिता आवश्यक ती उपाययोजना करावी, मृत पशुधनाच्या विल्हेवाटीची जागा ही सार्वजनिक जागा व पाणवठ्यापासून दूर असावी तसेच ती जागा काटेरी कुंपनाने संरक्षित असावी आणि तेथे फलक लावण्यात यावा.

**काय करू नये**

शीत लहरीच्या काळात पशुधनास उघड्यावर बांधू नये तसेच मोकाट सोडू नये. शीत लहरीमध्ये पशु मेळाव्यांचे आयोजन टाळावे. पशुधनास पिण्यास थंड पाणी देऊ नये. पशुधनाच्या निवाऱ्यात ओलसरपणा व धूर टाळावा. रात्री व थंडीत पशुधनास उघड्यावर बांधून ठेऊ नये. मृत पशुधनाचे शव कुरणावर अथवा चरावयाच्या मार्गात टाकू नये. स्थलांतर करणाऱ्या व रानात शेळी–मेंढी बसवणाऱ्या पशुपालकांनी विशेष खबरदारी घ्यावी. कुक्कुट पक्ष्यांचे वेळापत्रकानुसार लसीकरण करून घ्यावे. पुरेसा औषधी, क्षार मिश्रणे व जीवनसत्वे यांचा साठा ठेवावा.

**–माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

# वारंवार फुटणाऱ्या जलवाहिन्यांमुळे श्रीवर्धनचा पाणीपुरवठा धोक्यात

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहरासह रानवली, निगडी, बापवन व गालसुरे परिसरातील नागरिकांना पाणीपुरवठा करणाऱ्या रानवली लघु पाटबंधारे योजनेअंतर्गत असलेल्या जलवाहिन्या वारंवार फुटत असल्याने संपूर्ण पाणीपुरवठा यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या समस्येमुळे नळजोडणीधारक नागरिकांना पाणीटंचाई, गढूळ पाणी व अनियमित पुरवठ्याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

## नागरिकांची तीव्र नाराजी



१९७७ साली रानवली ग्रामपंचायत हद्दीत मातीचे पाझर धरण उभारण्यात आले होते. सुमारे ७०० मीटर लांबी, २.५० मीटर उंची व १२१ मीटर पूर्ण संचय पातळी असलेल्या या धरणाला नैसर्गिक जलस्त्रोत नसून, केवळ पावसाळ्यात साठणाऱ्या पाण्यावर संपूर्ण वर्षाचा पाणीपुरवठा अवलंबून आहे. श्रीवर्धन नगरपरिषद हद्दीत सुमारे २,५७० घरांना नळजोडणी देण्यात आली आहे.

२०२२-२३ या कालावधीत रानवली धरण परिसरात सुमारे २३ कोटी रुपये खर्चाचा जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात आला. या प्रकल्पांतर्गत ४६ वर्षे वापरात असलेल्या जुन्या जलवाहिन्या काढून त्यांच्या जागी उच्च घनतेच्या पॉलिथिलीन (कऊझए) जलवाहिन्या टाकण्यात आल्या. या प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा २०२३ साली उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पार पडला होता.

मात्र, प्रकल्प पूर्ण होऊन अल्प कालावधी लोटत नाही तोच रानवली ते श्रीवर्धन या सुमारे ८ किलोमीटर अंतरावर जलवाहिनी फुटण्याचे प्रकार वारंवार घडू लागले आहेत. विशेषतः पावसाळी काळात नळांमधून गढूळ पाणी येणे, अनेक वेळा पाणीपुरवठा पूर्णतः बंद ठेवणे, तसेच फुटलेल्या जलवाहिन्यांमधून मोठ्या प्रमाणावर पाणी रस्त्यावर साचणे, अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.

नगरपरिषदेकडून ध्वनीक्षेपक, घंटागाडी व फलकांच्या माध्यमातून ‘पाणी वाचवा’, ‘पाण्याचा वापर जपून करा’ तसेच ‘घरपट्टी व पाणीपट्टी वेळेत भरा’ असे संदेश वारंवार दिले जात आहेत. मात्र दुसरीकडे अगणित प्रमाणात वाया जाणारे पाणी रोखण्यासाठी ठोस व कायमस्वरूपी उपाययोजना होताना दिसत नाहीत, अशी नागरिकांची तक्रार आहे.

वारंवार होणाऱ्या जलवाहिनी फुटीमुळे होणारे पाण्याचे नुकसान, त्याचा आर्थिक भार आणि त्याची जबाबदारी नेमकी कोण घेणार, हा प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. वाया जाणाऱ्या पाण्याचा हिशेब नगरपरिषद स्वतः भरणार की त्याचा भार नागरिकांवर टाकला जाणार? असा सवाल श्रीवर्धनवासीय करत आहेत.

या पार्श्वभूमीवर, जलवाहिन्यांची गुणवत्ता तपासणी, दुरुस्तीचे निकष, दोषी कंत्राटदारांवर कारवाई, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी स्वतंत्र तांत्रिक यंत्रणा उभारणे, या बाबींकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होत आहे. अन्यथा श्रीवर्धनचा पाणीपुरवठा प्रश्न येत्या काळात अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# सलग सुट्ट्या व वाहतूक कोंडी समीकरण बोरघाटात ठरलेलेच!



**खालापूर : प्रतिनिधी**

आगामी नाताळ सुट्टी आणि शनिवार रविवार साप्ताहिक सुट्टी यांचा मेळ घालून पर्यटनासाठी निघालेल्या मुंबई ठाणे च्या पर्यटकांना बोरघाटात वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. त्यामध्ये अवजड वाहतूक करणारा ट्रक रस्त्याच्या मधोमध बंद पडला तर २५ च्या आसपास वाहनांचे क्लच प्लेट निकामी होऊन बंद पडल्याने वाहतूक कोंडी आणखी बिकट झाली. या समस्यांना सामोरे जात असतानाच बेशिस्त वाहन चालक वाट काढण्यासाठी वाहने उलटी सुलटी दामटवत पुढे जाण्याचा प्रयत्न करीत असताना वाहनांची कोंडी खुपचं बिकट झाली. महामार्ग वाहतूक पोलीस व सामाजिक कार्यकर्त्यांनी ही कोंडी सोडविण्यासाठी जिकिरीचे काम केले. अमृतांजन पुल खोपोली बायपास तसेच जुन्या महामार्गावरील अंडा पॉइंट शिंग्रोबा मंदिर ते खोपोली स्वागत कमान अशी वाहनांची रांग लागली होती. या घटनेने तब्बल ३ तास वाहतूक कोंडीचा सामना वाहनचालक व पर्यटकांना करावा लागला. मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावरील व जुन्या महामार्गावर मुंबई लेन अंडा पॉईंट या ठिकाणी मोठी गाडी पलटी झाला. वाहतूक पोलीसांनी अवजड वाहने रोखुन महामार्गावर ब्लॉक घेतला नंतर संथगतीने हळूहळू वाहतूक सुरू झाली मुंबई पुणे एक्सप्रेस वे आणि राष्ट्रीय महामार्ग (जुना महामार्ग) यावर वीक एंड असल्याने पुण्याकडे जाणाऱ्या वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढ झाली. वाहन चालक लेनची शिस्त पाळत नसल्याने वाहतूक कोंडी झाली आहे.

# पन्हळघर खुर्द येथे पाणी अडवा-पाणी जिरवा! नरेंद्र महाराज सांप्रदायाने बांधला बंधारा

**माणगाव : प्रतिनिधी**

स्वामी नरेंद्र महाराज संस्थान लोणेरे विभागाच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत व पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत पन्हळघर खुर्द येथील नदीवर पाणी अडवा – पाणी जिरवा या लोकसहभागातून बंधारा बांधण्याचे महत्त्वपूर्ण कार्य यशस्वीरीत्या पार पाडण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन लोणेरे गावचे अध्यक्ष तसेच नरेंद्र महाराज सांप्रदाय लोणेरे अध्यक्ष नंदकुमार टेंबे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते.



या मोहिमेचा मुख्य उद्देश परिसरातील पाण्याची पातळी वाढवणे, पावसाचे पाणी अडवून ते जमिनीत मुरवणे तसेच शेती व पिण्याच्या पाण्याची समस्या दूर करणे हा होता. बंधारा उभारणीसाठी नरेंद्र महाराज सांप्रदायाचे सर्व भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रमदान करत या उपक्रमात सक्रिय सहभागी झाले. भक्तांच्या एकत्रित प्रयत्नातून कमी वेळेत बंधारा उभारणीचे काम पूर्ण करण्यात आले.यावेळी पन्हळघर खुर्दचे सरपंच हारिदास शेडगे यांनी स्वामी नरेंद्र महाराज सांप्रदायाच्या सर्व भक्तांचे मनःपूर्वक स्वागत केले. गावाच्या विकासासाठी व जलसंधारणासाठी राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करत सर्व भक्तगणांचे तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागात पाण्याची उपलब्धता वाढून शेती, जनजीवन व पर्यावरण यांना मोठा लाभ होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना नंदकुमार टेंबे यांनी सांगितले की, पाणी हे जीवन आहे. भविष्यातील पाण्याच्या टंचाईवर मात करण्यासाठी आजच जलसंधारणाची कामे हाती घेणे गरजेचे आहे. स्वामी नरेंद्र महाराज संस्थानच्या माध्यमातून समाजोपयोगी व पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्याचा आमचा सातत्यपूर्ण प्रयत्न राहील.

या उपक्रमामुळे पन्हळघर खुर्द परिसरात जलसाठा वाढण्यास मदत होणार असून शेतकरी, ग्रामस्थ व भावी पिढीसाठी हा बंधारा उपयुक्त ठरणार आहे. लोकसहभागातून राबविण्यात आलेली ही पाणी अडवा – पाणी जिरवा मोहीम इतर गावांसाठीही प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना उपस्थितांमधून व्यक्त करण्यात आली.

# भक्तिमय वातावरणात बापदेव महाराज मूर्ती स्थापना

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे गावाचे श्रद्धास्थान परीट समाजाचे आराध्य दैवत बापदेव महाराज यांची मूर्ती स्थापना हायवेनाका भातगिरणी संस्थेच्या कार्यालया समोर अतिशय मंगलमय व भक्तिमय वातावरणात करण्यात आली.

शुक्रवार दि. १२ डिसेंबर रोजी सकाळी ०९ वाजता होमहवन व प्राणप्रतिष्ठा ध्वजपूजन तसेच सकाळी ११ ते १२ वाजता आरती व तीर्थप्रसाद कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमा प्रसंगी श्री जोगेश्वरी माता विश्वस्त कमिटी सचिव भाईसाहेब टके यांचा बापदेव महाराज देवस्थान कमिटीच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी भाईसाहेब टके यांच्या भातगिरणी संस्थेचे सभापती सदानंद गायकर,समवेत नागोठणे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विलास चौलकर, नागोठणेचे पहिले लोकनियुक्त सरपंच तथा सदस्य डॉ. मिलिंद धात्रक, माजी सरपंच प्रकाशशेठ जैन, मधुकर ठमके, चंद्रकांत गायकवाड, सुनील लाड, संतोष नागोठणेकर,रोहिदास हातलोनकर, निलेश घाग, नितीन घाग,यशवंत शिर्के,चंद्रकांत भोईर, यशवंत शिर्के, पोशा रागटी आदी उपस्थित होते. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष चंद्रकांत घाग, उपाध्यक्ष पुरुषोत्तम घाग, सचिव दिनेश घाग, कार्याध्यक्ष सुदाम घाग, शांताराम घाग, भास्कर घाग,गणेश घाग आदी पदाधिकारी सदस्य व परीट समाजाने मेहनत घेतली.




परिशिष्ट क्र. १६
(उपविधी क्र. ३५ अन्वये)
मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी द्यावयाच्या नोटिशीचा नमुना

**नोटीस**

**सरकारी नोकर** सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता नवीन पनवेल या संस्थेचे सदस्य असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत / भूखंडावर / गाळा / बंगला क्र. ...... धारण करणाऱ्या श्री.श्रीकृष्ण विष्णू कवटेकर यांचे तारीख ३०/०४/२०२५ रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था, या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मागणीदार/हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या/हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत, कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील / मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्कमागण्या/हरकती आल्या तर, त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांस/हरकतदारांस पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे दुपारी १२:०० वा. ते दुपारी ४:०० वा. पर्यंत, नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

**ठिकाण : नवीन पनवेल**
**दिनांक : १३/१२/२०२५**

**सही/-**
सरकारी नोकर... सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित यांच्या करिता आणि वतीने


# रेवदंड्यात मटका अड्ड्यावर धाड; दोघांवर गुन्हा दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**




रेवदंडा येथे पारनाका नजीक जनसेवा डेअरीचा बाजुला लोकांकडून पैसे स्विकारून चिठ्ठयावर आकडेमोड लिहून कल्याण-मेन नावाचा जुगाराचा मटका बेकायदेशीरपणे चालवित असलेल्या दोघावर स्थानिक गुन्हे अन्वेषक शाखा अलिबाग यांनी कारवाई केली. याबाबत सविस्तर वृत्त असे की, रेवदंडा येथे पारनाका नजीक जनसेवा डेअरीच्या मोकळया जागेत शुक्रवार दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी सायकांळी ४.०० वाजण्याचे सुमारास अलिबाग स्थानिक गुन्हे अन्वेषक शाखेने धाड टाकून लोकांकडून पैसे स्विकारून चिठ्ठयावर आकडेमोड लिहून कल्याण-मेन नावाचा जुगाराचा मटका बेकायदेशीरपणे चालवित असलेल्या ५४ वर्षीय ताजपुर येथील रहिवाशी अनंत शंकर पाटील यांस रंगेहाथ पकडले. या कल्याण-मेन मटक्याची रक्कम आशिष गोंधळी यांचेकडे जमा करत असे, अलिबाग गुन्हे अन्वेषक यांनी या दोघावर कारवाई करून यामध्ये एकूण ३८३५ रूपये रक्कम जप्त करून ताब्यात घेतली.

# श्रीवर्धन येथे भक्तीचा संगम

## माता सोमजाई देवी रथोत्सवाचा समारोप

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

हाकेला धावणारी, नवसाला पावणारी अशी अखंड श्रद्धा लाभलेल्या श्रीवर्धन तालुक्याच्या ग्रामदैवत माता सोमजाई देवी यांचा वार्षिक रथोत्सव अत्यंत भक्तीभाव, उत्साह आणि पारंपरिक थाटात मोठ्या जल्लोषात संपन्न झाला. या सोहळ्याने अवघं श्रीवर्धन भक्तिरसात न्हाऊन निघालं. दक्षिण काशी म्हणून ओळख असलेल्या श्री सोमजादेवी देवस्थानात रथोत्सव सप्ताहात कोकणासह मुंबई-पुणे, सातारा-कोल्हापूर, विदर्भ-मराठवाडा आदी भागांतून हजारो भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली. जागृत देवी म्हणून प्रसिद्ध असलेल्या मातेसमोर नवस फेडण्यासाठी भाविकांचा अखंड ओघ सुरू होता. रथोत्सवाच्या दिवशी रात्री ठीक १२ वाजता रथयात्रेचा मंगल प्रारंभ झाला. ढोल-ताशांचा गजर, शंखनाद, भजन-कीर्तन, देवीच्या नामघोषात संपूर्ण शहर भक्तिमय वातावरणात दुमदुमून गेले. प्रत्येक नाक्यावर फटाक्यांची आतषबाजी, तर फुलांच्या रांगोळ्यांनी शहर सजलं होतं. रथयात्रेदरम्यान प्रत्येक चौकात माता सोमजाई देवीची मनोभावे पूजाअर्चा करण्यात आली. महिला, युवक, वृद्ध, बालगोपाल सर्वजण भक्तीगीत गात, नृत्य करत आनंदोत्सव साजरा करताना दिसून आले. हा अद्भुत सोहळा पाहताना डोळ्यांचे पारणे फिटावे, असे दृश्य सर्वत्र अनुभवायला मिळून आले.







रथोत्सव सप्ताहात काकड आरती, महाप्रसाद, पूजाविधी आणि धार्मिक कार्यक्रमांना भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शेकडो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला, तर दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी माता सोमजाई देवीच्या चरणी कृतज्ञतेने नतमस्तक होत मनोकामना अर्पण केल्या. मनोकामना पूर्ण करणारी जागृत माता अशी ख्याती असलेल्या सोमजाई देवीच्या कृपेची अनुभूती घेतल्याची भावना भाविकांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती.राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या भक्तांनी हा दिव्य सोहळा पाहण्यासाठी आणि आनंद लुटण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.देवस्थान ट्रस्ट व ग्रामस्थांच्या उत्तम नियोजनामुळे, शिस्तबद्ध आणि भक्तिभावाच्या वातावरणात माता सोमजाई देवीचा रथोत्सव अत्यंत यशस्वी व उत्साहात पार पडला. माता सोमजाई देवी सर्व भाविकांवर कृपादृष्टी ठेवो, हीच प्रार्थना.


## पनवेल महानगरपालिका
### ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६

ई-मेल : panvelcorporation@gmail.com दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२
pmc.townplanning@gmail.com वेबसाईट - panvelcorporation.com

ई-निविदा सूचना क्र: पमपा/सा.बां. (श.अ.)/५५२५/प्र.क्र.०३/२१३०/२०२५ दिनांक: १२/१२/२०२५

**जाहीर निविदा सुचना**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ नगरोत्थान महाअभियान (जिल्हा स्तर) या योजनेअंतर्गत कामे

| अ. क्र. | | कामाचे नाव | निविदा क्र. | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू. | इसारा रक्कम रुपये | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ५१ | प्रभाग क्र.१० शर्मा बेकरी ते कृष्णा भगत घरत रस्ता आर.सी. सी. कॉंक्रीटीकरण करणे. | PMC/PWD (C.E./४७/ २०२५ | ७,८२.९१२/- | ८००० | ६ महिने |
| २. | ५६ | प्रभाग क्र.१० कळंबोली सेक्टर-१ एल.आय. जी. १ येथे हनुमान मंदिर ते सेंट जोसेफ शाळा पर्यंत फुटपाथ रस्ता तयार करणे. | PMC/PWD (C.E./४८/ २०२५ | ७,९१,८१७/- | ८००० | ६ महिने |
| ३. | ५७ | प्रभाग क्र.१० कळंबोली सेक्टर-१ सुधागड शाळेच्या मागील रस्ता तयार करणे, | PMC/PWD (C.E./४९/ २०२५ | ७,७३,९०९/- | ८००० | ६ महिने |
| ४. | ३१/०९ | प्रभाग क्र.१० कळंबोली मधील अंगणवाडी क्र.४३ एलआयली-२ सेक्टर१ (शिवशंभो सोसायटी) रस्ता तयार करणे. | PMC/PWD (C.E./५०/ २०२५ | ७,९८,८५८/- | ३००० | ६ महिने |
| ५. | ३१/१० | प्रभाग क्र.१० कळंबोली मधील अंगणवाडी क्र.४४ एलआयली-२ सेक्टर१ (श्री भवानी मंदिर) रस्ता तयार करणे, | PMC/PWD (C.E./५१/ २०२५ | ७०,२०,४५/- | ७५०० | ६ महिने |
| ६. | ३१/११ | प्रभाग क्र.१० कळंबोली मधील अंगणवाडी क्र.४५ एलआयली-२ सेक्टर १ (साईनाथ सोसायटीसमोर) रस्ता तयार करणे, | PMC/PWD (C.E./५२/ २०२५ | ७,८५,३५२/- | ८००० | ६ महिने |

उपरोक्त कामांच्या को-या निविदा पनवेल महानगरपालिका बांधकाम (श.अ.) विभागात उपलब्ध आहेत. इच्छुकांनी सदरच्या निविदा दिनांक १५/१२/२०२५ ते २३/१२/२०२५ रोजी सायं ४.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या बांधकाम (श.अ.) विभागाकडे सादर करावीत. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ७११/७३५/२०२५**
**दिनांक :- १३/१२/२०२५**

**सही/-**
**( गणेश शेटे)**
**अतिरिक्त आयुक्त- ।**
**पनवेल महानगरपालिका, पनवेल**

# पनवेल महानगरपालिका

## वैदयकीय आरोग्य विभाग

कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल -410206

दुरध्वनी कार्यालय : 022- 27458040/41/42 फॅक्स नं. : 022- 27452233 वैद्यकीय आरोग्य विभाग : 022 – 27455751
आयुक्त कार्यालय : 022- 27452339 ई-मेल : mohpmc05@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com
जा.क्र./पमपा/वै.आ.वि.का./1786/सन 2025-26 दिनांक:- 13/12/2025

# पदभरती जाहिरात

**वाचा :- 1**.मंजुर प्रकल्प अंमलबजावणी आराखडा सन 2025-26 नुसार मंजुर पदे **2**.महाराष्ट्र परावैद्यक परिषद, मुंबई यांचे पत्र क्र. मपवैप/ आसे/ पदभरती/ 336/ 2022 दि.21.12.2022 **3**.मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे कडील पत्र जा. क्रं.राआसो/मनुष्यबळ कक्ष/ सुधारित पदभरती समिती /10266-10600/2023 दि.26.04.2023 **4**.मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे कडील पत्र जा. क्रं.राआसोमुं / मनुष्यबळ कक्ष/ पदभरती /10670-11016/2023 दि.27.04.2023. **5**.सहाय्यक संचालक राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांचे कडील पत्र जा.क्र. रानाआअ /शैक्षणिक पात्रता/ एनयुएचएम/24004-24187/23 दि 24.05.2023 **6**.शासन निर्णय क्रमांक : बीसीसी - 2021 / प्र.क्र. 77 / 16 क दिनांक 06.03.2024 **7**. मा. सहसंचालक (अतांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे कडील पत्र जा.क्र. राआसोमुं /मनुष्यबळ/ कं.पदभरती/ 27415-663/2024 दि.3.07.2024 **8**.शासन निर्णय क्रमांक : बीसीसी - 2024 / प्र.क्र. 246(ई-848503)/ आरक्षण - 5 दिनांक: 23.09.2025 **9**.मा. आयुक्त महोदय यांची दि. 11.12.2025 मंजुर टिपणी.

पनवेल महानगरपालिका, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, 15 वा वित्त आयोग, हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना व पॉलिक्लिनिक अंतर्गत खालील तक्यात दर्शविल्याप्रमाणे रिक्त असलेल्या पदांवर निव्वळ कंत्राटी स्वरूपात करार पध्दतीने मानधन तत्वावर नियुक्ती करावयाची आहे. सदरची पदभरतीची प्रक्रिया पनवेल महानगरपालिकास्तरावर राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत गठीत केलेल्या समितीमार्फत करण्यात येणार आहेत. यानुसार पुर्णवेळ वैद्यकीय अधिकारी, अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी, मायक्राबायोलॉजिस्ट (Microbiologist) व विशेषतज्ञ (Specialist) या रिक्त पदांकरीता थेट मुलाखत (Walk in Interview) दिनांक 22.12.2025 व 23.12.2025 रोजी सकाळी 10.00 वाजता पनवेल महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभाग, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी पनवेल -410206 येथे आयोजित करण्यात आलेली आहे. तसेच प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माता, LHV, स्टाफ नर्स (स्त्री), स्टाफ नर्स (पुरुष) व बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (MPW)-पुरूष ही पदे गुणांकन पद्धतीने (Merit) भरण्यात येणार असल्याने इच्छुक व पात्र उमेदवारांनी विहित नमुन्यात अर्ज पनवेल महानगरपालिका, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, वैद्यकीय आरोग्य विभाग, सिडको समाज केंद्र, सेक्टर 21, कामोठे, पनवेल 410206, येथे दिनांक 13.12.2025 ते 26.12.2025 या कालावधीत सादर करावेत.पनवेल महानगरपालिकेकरीता मंजुर प्रकल्प अंमलबजावणी आराखडयानुसार व शासनाकडील रिक्त कंत्राटी पदांच्या पदभरतीच्या प्राप्त मार्गदर्शक सुचनेनुसार राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, 15 वा वित्त आयोग, हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना व पॉलिक्लिनिक अंतर्गत रिक्त पदे भरण्याकरिता जाहिरात महानगरपालिकेच्या https://www.panvelcorporation.com या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

### राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM)

| अक्र | पदाचे नाव | प्रवर्गानुसार रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | प्रतिमहा एकत्रित मानधन (रूपये मध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **पुर्णवेळ वैदयकीय अधिकारी** | अजा -2<br>अज - 1<br>भजब - 1<br>एस.ई.बी.सी - 2<br>आदुघ - 1<br>अराखीव - 1<br>**एकुण - 08** | MBBS with MMC Reg Preference will be given to for bond completion and experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्ष | 60,000/- |
| 2 | **अर्धवेळ वैदयकीय अधिकारी** | बिंदुनामावली लागु नाही<br>**एकुण - 06** | MBBS with MMC Reg Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्ष | 30,000/- |
| 3 | मायक्रोबायोलॉजिस्ट | एकाकी पदास बिंदुनामावली लागु नाही<br>**एकुण - 01** | MD Microbiology Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्ष | 75,000/- |
| 4 | **LHV** | अज - 1<br>एकुण - 01- | B.SC. Nursing / GNM with MNC Registration. Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 64 वर्ष | 20,000/ |
| 5 | **औषधनिर्माता** | एस.ई.बी.सी - 2<br>आदुघ - 1<br>**एकुण - 03** | 12th + Diploma (D Pharm) / B Pharm with MSPC Registration Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 64 वर्ष | 17,000/- |
| 6 | **प्रयोगशाळा तंत्रज्ञ** | अजा - 1<br>एस.ई.बी.सी - 2<br>आदुघ - 1<br>**एकुण - 04** | 12th + Diploma with Maharashtra Paramedical Council Registration Preference will be given to experienced Candidates सदर पदाकरीता खालील संस्थेमधुन शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवारांनी अर्ज सादर करावे. 1) DPU Dr.D.Y. Patil Vidyapeeth, Pune (Deemed University) (Under Section 3 of the UGC Act, 1956)2) Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik (Established by Govt. Of Maharashtra ) 3) Maharashtra State Board of Technical Education, 49, Kherwadi, Bandra (E) Mumbai. 4) Shreemati Nathibai Damodar Thackersey, Women's University, Mumbai- 400049. 5) Maharashtra University of Health Sciences, Nashik, India. 6) Tata Institute of Social Science, Devnar, Mumbai. | उच्चतम वयोमर्यादा 64 वर्ष | 17,000/- |
| 7 | **मानसोपचार तज्ञ Psychiatrist** | बिंदुनामावली लागु नाही<br>**एकुण - 03** | 1) MBBS with MD Psychiatric / DPM/DNB 2) Maharashtra Medical Council Registration (Preference will be given to experienced Candidates) | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्ष | To visit once in every fortnight. Rs.2000 to be paid as fixed amount per visit + Rs. 100 per patient checked his/her speciality, maximum to Rs.5000/ per visit |
| 8 | **स्त्रीरोग व प्रसुती तज्ञ** Obstetrician & Gynaecologist | बिंदुनामावली लागु नाही<br>**एकुण - 01** | 1) MBBS with MD / MS Gyn / DGO / DNB 2) Maharashtra Medical Council Registration (Preference will be given to experienced Candidates) | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्ष | To visit once in every week. Rs.2000 to be paid as fixed amount per visit + Rs.100 per patient checked of his/her speciality to maximum Rs.5000/ visit. |

### 15 वा वित्त आयोग (15 th Fc)

| अक्र | पदाचे नाव | प्रवर्गानुसार रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | प्रतिमहा एकत्रित मानधन (रूपये मध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | वैदयकीय अधिकारी | अजा - 1<br>अज - 1<br>एस.ई.बी.सी - 1<br>आदुघ - 1<br>**एकुण - 04** | MBBS with MMC Reg Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्ष | 60,000/- |
| 2 | स्टाफ नर्स (स्त्री) | अजा - 1<br>अज - 1<br>इमाव - 1<br>एस.ई.बी.सी - 1<br>आदुघ - 1<br>अराखीव - 2<br>**एकुण - 07** | B.SC. Nursing / GNM with MNC Registration Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 64 वर्ष | 20,000/- |
| 3 | स्टाफ नर्स (पुरूष) | एकाकी पदास बिंदुनामावली लागु नाही<br>**एकुण - 01** | B.SC. Nursing / GNM with MNC Registration Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 64 वर्ष | 20,000/- |
| 4 | बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (MPW) पुरूष | अजा - 1<br>अज - 1<br>विजाअ - 1<br>एस.ई.बी.सी - 1<br>आदुघ - 1<br>अराखीव - 1<br>**एकुण - 06** | 12th pass in Science + Paramedical Basic Training Course OR Sanitary Inspector Course Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 64 वर्ष | 18,000/- |

### हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना (HBT)

| अक्र | पदाचे नाव | प्रवर्गानुसार रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | प्रतिमहा एकत्रित मानधन (रूपये मध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **वैदयकीय अधिकारी** | अजा - 1<br>**एकुण - 01** | MBBS with MMC Reg Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्ष | 60,000/- |
| 2 | **स्टाफ नर्स (स्त्री)** | अज - 1<br>अराखीव - 1<br>**एकुण - 02** | B.SC. Nursing / GNM with MNC Registration Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 64 वर्ष | 20,000/- |
| 3 | **बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (MPW) पुरूष** | अराखीव - 1<br>**एकुण - 01** | 12th pass in Science + Paramedical Basic Training Course OR Sanitary Inspector Course Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 64 वर्ष | 18,000/- |
| 4 | **मानसोपचार तज्ञ Psychiatrist** | बिंदुनामावली लागु नाही<br>**एकुण - 02** | 1) MBBS with MD Psychiatry / DPM/DNB 2) Maharashtra Medical Council Registration (Preference will be given to experienced Candidates) | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्ष | To visit once in every fortnight. Rs.2000 to be paid as fixed amount per visit + Rs. 100 per patient checked his/her speciality, maximum to Rs.5000/ per visit |
| 5 | **त्वचारोग तज्ञ Dermatologist** | बिंदुनामावली लागु नाही<br>**एकुण - 01** | 1) MBBS with MD (Skin / VD), DVD, DNB 2) Maharashtra Medical Council Registration (Preference will be given to experienced Candidates) | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्ष | To visit once in every fortnight. Rs.2000 to be paid as fixed amount per visit + Rs. 100 per patient checked his/her speciality, maximum to Rs.5000/ per visit |

उपरोक्त तक्यात नमुद केल्यानुसार अर्जदारांच्या थेट मुलाखतीद्वारे व गुणांकन पद्धतीनुसार निवड सुचीमधील पात्र उमेदवारांना त्यांच्या गुणवत्तेनुसार जाहिरातीत प्रसिध्द केलेल्या रिक्त पदांवर नियुक्ती दिली जाईल व उर्वरीत पात्र उमेदवारांची पदनिहाय प्रतिक्षायादी ठेवण्यात येईल. भविष्यात रिक्त होणाऱ्या पदांवर पदनिहाय प्रतिक्षायादी मधील उमेदवारांमधुन त्यांच्या गुणवत्ते प्रमाणे नियुक्ती दिली जाईल. सदर प्रतिक्षायादीचा वैधता कालावधी निवड यादी प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासुन केवळ 01 वर्ष राहील. तसेच उमेदवारास एका पदापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदांसाठी स्वतंत्र अर्ज सादर करावयाचा आहे. जाहिरातीमधील सर्व सुचनांचे व निकषांचे काळजीपुर्वक वाचन करून अर्ज विहित केलेल्या पद्धतीनुसारच सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या नमुद माहितीच्या आधारे व मुलाखतीदरम्यान सादर केलेल्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या / कागदपत्रांच्या आधारे उमेदवार पात्र व अपात्र ठरविण्यात येईल व त्या आधारे त्याचा समावेश पुढील निवड प्रक्रियेत करण्यात येईल.**अर्जदाराची वयोमर्यादा**-1) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दिनांक 25 एप्रिल 2016 चे शासन निर्णयानुसार अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत उमेदवाराचे वय जाहिरातीमध्ये विहित केलेल्या वयोमर्यादेत असणे आवश्यक आहे. 2) मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे दिनांक २५ मे २०१९ रोजीच्या पत्रानुसार वैद्यकीय अधिकारी (MBBS), विशेषतज्ञ, अतिविशेषतज्ञ यांची वयोमर्यादा 70 वर्षे पर्यंत राहील. तसेच वय वर्ष ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कडुन प्राप्त केलेले शारिरीक दृष्ट्या व मानसिक दृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील. 3) राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानात सद्यस्थितीत कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना वयोमर्यादा शिथिलक्षम राहील. तथापि, कागदपत्रे पडताळणी दरम्यान सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या संबंधित कार्यालय प्रमुखांच्या स्वाक्षरीचे तशा आशयाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाच्या मंजुर मनुष्यबळ धोरणानुसार (HR Policy) वयोमर्यादा खालीलप्रमाणे राहील.•

**The calculation of age for the contractual year shall be on date of publishing of advertisement.** (a) Minimum Age: No person shall be eligible for employment under National Health Mission, Maharashtra unless he/she has completed 18 years of age. (Annexure 1-2 & 3 NHM Circular dated 29.9.2018 & 28.05.2019) (b) Maximum Age for entry: Maximum age for entry shall be (1) 69 years for MO MBBS and specialists (2) 64 years for Nursing and Paramedical Staff and (3) For remaining posts 38 years for open category and 43 years for reserved category candidates. (c) No age bar for the employees already working under NHM and wish to apply for another post within NHM (d) Applicants above 60 years are mandated to produce physical fitness certificate certified by civil surgeon (Annexure 1- 2.NHM Circular dated 29.9.2018). (e) All NHM employees should not have any administrative or financial proceedings, penal proceedings, criminal or any other type of serious crime against him during previous government service period. (Annexure I - 2.NHM Circular dated 29.9.2018).• **Age limit for end of contractual service:** (1) The age limit for end of contractual service shall be (1) 70 years for MO MBBS and specialists (2) 65 years for Nursing and Paramedical Staff and (3) 60 years for remaining posts. (Annexure I-3.NHM Circular dated 28.05.2019) **अर्ज भरण्याबाबतच्या सुचना** –1) अर्जात दिलेल्या प्रत्येक मुद्द्यांची माहिती अचुक भरावी. एकदा भरलेली माहिती अंतिम समजण्यात येईल व त्यात कोणताही बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी. 2) उमेदवाराने स्वत:चे पूर्ण नाव माध्यमिक शालांत प्रमाणपत्राप्रमाणे अचूकपणे नोंदवावे. अर्जासोबत माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्राची प्रत जोडावी.3) जन्माचा दाखला / शाळा सोडल्याचा दाखला किंवा माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जन्मतारीख अर्जात अचुक नमूद करावी. 4) जाहिरात प्रसिध्द केलेल्या शेवटच्या दिनांकापर्यंत असणारे उमेदवाराचे वय (दिवस, महिने व वर्ष ) अचूक नमुद करावे.5) अर्जदार ज्या कार्यक्रमा अंतर्गत व ज्या पदासाठी अर्ज करत आहे त्या कार्यक्रमाचे व पदाचे नाव विहित नमुन्यातील अर्जावर सुस्पष्ट नमुद करणे आवश्यक आहे.6) उमेदवारांस एका पदापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करावयाचा आहे.7) अर्जात उमेदवाराचे लिंग व वैवाहिक दर्जा या बाबतची माहिती नमूद करावी.8) महिला अर्जदार विवाहित असल्यास व नावात बदल असल्यास **विवाह नोंदणी प्रमाणपत्र (Marriage Registration Certificate) किंवा** नावात बदल झाल्यामुळे (Govt. Gazette) मध्ये असा बदल जाहीर केल्याचे शासकीय राजपत्रामधील (Govt. Gazette) अर्जदाराचे नाव असलेल्या पानाची स्व - साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. 9) अर्जामध्ये उमेदवाराने स्वत:चा वैध ई-मेल आयडी/पर्यायी ई-मेल आयडी, सुरू असलेल्या भ्रमणध्वनीचा क्रमांक/पर्यायी भ्रमणध्वनीचा क्रमांक नमूद करणे बंधनकारक आहे. 10) उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी आहे किंवा कसे हे नमूद करणे आवश्यक आहे, असल्यास त्याबाबतचे विहीत प्रमाणपत्र (Domicile Certificate) अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे.11) उमेदवाराने अर्जामध्ये आपला जात, धर्म हा तपशील अचूकपणे नमूद करावा.12) इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, आर्थिक दृष्टया दुर्बल घटक, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गात मोडणाऱ्या उमेदवारांनी अर्जासोबत त्यांचे जात-प्रमाणपत्र/ जात वैधता प्रमाणपत्र व वैध असलेले नॉन क्रिमिलेअर (Non Cremelayer) प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. अन्यथा अशा उमेदवारांचे अर्ज रद्द करण्यात येतील.13) अर्जदाराने आपला सध्याचा पत्ता व कायमस्वरूपी पत्ता तसेच ई- मेल व मोबाईल नंबर अर्जामध्ये अचूक नमूद करावा.14) अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा. त्याबाबतचे अर्जासोबतचे विहित नमुन्यातील अर्जदाराने स्वाक्षरी केलेले हमीपत्र सादर करावे. अर्जासोबत हमीपत्राचा नमुना देण्यात आलेला आहे.15) अर्ज विहित नमुन्यात टंकलिखीत / स्वहस्ताक्षरात, स्वसाक्षरीने व सर्व दृष्टीने पुर्ण असावेत. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपुर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत

**शैक्षणिक अर्हता/पात्रता**-1) अर्जामध्ये शैक्षणिक अर्हतेबाबतचा सविस्तर व अचूक तपशील नोंद करावा.2) अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेला उमेदवाराकडे जाहिरातीमध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता असणे आवश्यक आहे.3) अर्ज भरत असताना अंतिम वर्षाच्या मिळालेले गुण व गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुण व गुणांची टक्केवारी नमूद करणे अनिवार्य आहे. प्रमाणपत्रामध्ये नमूद गुण व गुणांची टक्केवारी ही अर्जातील नमुद टक्केवारी व गुण यांच्याशी न जुळल्यास, असे अर्ज नामंजूर करण्यात येतील. 4) अंतिम वर्षाच्या मिळालले गुण ग्रेड किंवा श्रेणी यांचे मध्ये असल्यास त्याचे रूपांतर गुणांच्या टक्केवारीमध्ये करून त्याबाबतचे संबंधित शैक्षणिक संस्था, महाविद्यालय, शैक्षणिक परिषद किंवा विद्यापिठ यांचे प्रमाणपत्र (Conversion Certificate) अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहे. 5) अर्जदारांनी अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेच्या गुणपत्रिकेची छायांकित स्वसाक्षांकित प्रत व इतर आवश्यक ती सर्व प्रमाणपत्रे सादर न केल्यास संबंधित उमेदवारांना अपात्र ठरविण्यात येईल.6) पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता/पात्रता ही शासकीय मान्यताप्राप्त शिक्षण मंडळ, शैक्षणिक संस्था, शिक्षण परिषद व विद्यापीठ यामधुनच प्राप्त केलेली असणे बंधनकारक आहे..7) अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केलेल्या माहितीनुसार अर्जाची छाननी करण्यात येईल. त्यामुळे सदरची माहिती अपुरी किंवा चुकीची असु नये याची दक्षता घ्यावी.**8) वैदयकीय अधिकारी,मायक्राबायोलॉजिस्ट व विशेषतज्ञ या पदांसाठी पात्र उमेदवारांनी थेट मुलाखती दरम्यान आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या मुळ गुणपत्रिका सादर न केल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल**.

**अनुभव** –1) शैक्षणिक अर्हता व आवश्यक अतिरिक्त शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचाच फक्त शासकीय, निम शासकीय व खाजगी संस्थांमधील केवळ पदाशी निगडीत अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. त्यामुळे अर्जदाराने शैक्षणिक अर्हता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करू नये. त्या अनुभवाची परिगणना करण्यात येणार नाही.2) अर्जदाराने अनुभवाचा तपशील नमूद करीत असताना शासकीय, निम शासकीय व खाजगी संस्थेच्या अनुभव प्रमाणपत्रामधील रूजु दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. सदर अनुभवाचा कालावधी अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये कोणत्याही प्रकारची तफावत आढळल्यास सदर प्रमाणपत्र अवैध ठरविले जाईल.3) अर्जदाराने ज्या पदाकरीता अर्ज केलेला आहे त्या पदाशी निगडित अनुभवच ग्राह्य धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास ग्राहय धरण्यात येणार नाही. **संगणक अर्हता**-1) MS - CIT प्रमाणपत्र किंवा तत्सम पात्रता धारण करीत असल्याचा तपशील नमूद करावा व त्याबाबचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडण्यात यावे. **लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र**-1. लहान कुटुंबाची अट दिनांक २३/०७/२०२० रोजी पासुन लागू करण्यात आलेले आहे. यानुसार दिनांक २३/०७/२०२० रोजी पासुन दोन पेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदभरतीसाठी अर्जकरण्यास अपात्र ठरतील. 2. लहान कुटुंबाचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र अर्जदारानेअर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे. **अर्ज शुल्क** – १) अर्जदाराने अर्जा सोबत अर्ज शुल्कासाठी कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (DD) जोडणे आवश्यक आहे.खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.700/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.500/-असे अर्जाचे शुल्क राहील. त्यासाठी राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष पुढील नावे काढावा. A/c Name :- **Corporation Integrated Health and Family Welfare Society,** Bank Name :- Bank Of India A/C No :- 121210110080348 IFSC Code :- BKID0001212 2) अर्जदाराला ज्या ज्या पदासाठी अर्ज करावयाचाआहे, त्या प्रत्येक पदासाठी स्वतंत्रपणे उपरोक्त नमुद केल्यानुसार धनाकर्ष अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे. 3)राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षा व्यतिरिक्त इतरकोणत्याही बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) स्विकारला जाणार नाही. धनाकर्षा शिवाय प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. असे अर्ज अपात्रकरण्यात येतील, याची प्रकर्षाने नोंद घ्यावी. **उमेदवाराचा फोटोव स्वाक्षरी-** १) उमेदवाराने अर्जावरील फॉर्मवर फोटोकरीता राखीव ठेवलेल्या जागेवरत्यांचा अलीकडील काढलेला सुस्पष्टफोटो चिकटवावा. फोटो स्टेपल करू नये. २) अर्जदाराने स्वाक्षरीसाठीराखीव ठेवलेल्या जागेत स्वाक्षरी करावी .**निवड प्रक्रिया-** सदर कंत्राटी पदभरतीच्या अनुषंगाने निवड प्रक्रियेसाठी मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं. राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/ पदभरती/10670-11016/2023 दि.27.04.2023 रोजीचे पत्राद्वारे प्राप्त सुचना पुढील प्रमाणे आहेत.1) वैदयकीय अधिकारी, मायक्राबायोलॉजिस्ट व विशेषतज्ञ या पदांचीनिवड थेट मुलाखतीद्वारे (Walk in Interview) करण्यात येईल. सदर थेट मुलाखतीकरीता खालीलप्रमाणे गुणांकन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

### गुणांकन पद्धती (थेट मुलाखतीसाठी)

| अ.क्र | विवरण | अधिकत्तम गुण |
|---|---|---|
| 1 | Subject Knowledge | 10 |
| 2 | "Research & Academic Knowledge " | 10 |
| 3 | Leadership Quality | 10 |
| 4 | Administrative Abilities | 10 |

| अ.क्र | | विवरण | अधिकत्तम गुण |
|---|---|---|---|
| 5 | Experience<br>a) For Govt. Experience<br>b) For Private Experience | 2 Marks for one year.<br>1 Marks for one year | 10 |
| | | | **एकुण गुण 50** |

जा.क्र. पमपा / जनसंपर्क / ३१२५/ प्र.क्र.७१३/७३७/२०२५ दिनांक - १२/१२/२०२५

पुढे पहा

पान ७ वर..

# महिलांवरील हिंसाचाराविरोधात जनजागृती

## नवीन पनवेल येथे रॅली




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या वतीने महिलांवरील हिंसाचार निर्मूलन आंतरराष्ट्रीय दिनानिमित्त शनिवारी (दि.१३) महिलांची सुरक्षितता, सन्मान व सक्षमीकरण याबाबत जागृती करण्याच्या उद्देशाने जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.

या वेळी क्लबच्या अध्यक्ष शुभांगी पिंपळकर, आयपीपी डॉ. विणा मनोहर, सचिव डॉ. अमृता नाईक, खजिनदार अवंतिका मरुळकर, क्लब एडिटर वर्षा प्रशांत ठाकूर, कोर कमिटी सदस्य प्रिया ठाकूर, झोनल ई एडमिन ॲड.सुनीता जोशी, चाइल्ड अँड युथ डायरेक्टर सुलभा निंबाळकर, क्लब सदस्य अनिता शेट्ये, मिताली साखरे, विनया सहस्त्रबुद्धे, असे विविध मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते. या सर्वांचे मार्गदर्शन सक्रिय सहभाग व सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

या जनजागृती रॅलीत नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील ७० विद्यार्थिनींनी तसेच सहशिक्षिका पल्लवी कर्पे, सविता सावंत, स्मिता नाईक, माधुरी पाटील, अंजली कुलकर्णी, कावेरी थोरात यांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. रॅलीदरम्यान महिलांवरील हिंसाचार निर्मूलन व लैंगिक समानतेचा संदेश देणारे फलक व अर्थपूर्ण घोषणा विद्यार्थिनींकडून देण्यात आल्या. सीकेटी विद्यालयातून रॅलीची सुरुवात झाली. संपूर्ण नवीन पनवेल परिसरातील नागरिकांकडून या रॅलीस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या संपूर्ण कार्यक्रमासाठी उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

या जनजागृती कार्यक्रमाचा एक भाग म्हणून संस्थेतर्फे १२ डिसेंबर रोजी ऑरेंज द वर्ल्ड या विषयावर पोस्टर मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमुळे विद्यार्थिनींना महिलांचे हक्क, सुरक्षितता, समानता व सक्षमीकरण याविषयी आपले विचार सर्जनशीलतेने मांडण्याची संधी मिळाली. या स्पर्धेत सीकेटी ज्युनिअर कॉलेजच्या ईश्वरी उमेश गायकवाड (१२वी सायन्स) हिने प्रथम क्रमांक, प्रियाकुमारी अजय तत्व, (११वी कॉमर्स) हिने द्वितीय क्रमांक तर श्रावणी वसंत सावंत (११वी सायन्स) हिने तृतीय क्रमांक पटकावला.

कोणत्याही महिलेसोबत काहीही अयोग्य घडल्यास भीती न बाळगता तत्काळ संबंधित अधिकाऱ्याकडे किंवा विश्वासू व्यक्तीकडे तक्रार करावी असा संदेश झोनल ई एडमिन ॲड.सुनिता जोशी यांनी आपल्या भाषणातून दिला.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांच्या मौल्यवान योगदानाबद्दल कृतज्ञतेची भावना व्यक्त करण्यासाठी इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांच्या हस्ते महिलांचा विशेष सन्मान करण्यात आला.

# पिल्लई मेकरथॉन ७.०मध्ये 'सीकेटी'चे विद्यार्थी चमकले



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पिल्लई युनिव्हर्सिटी नवीन पनवेलतर्फे १० डिसेंबर रोजी आंतर महाविद्यालयीन मेकरथॉन स्पर्धेचे आयोजन केले होते. या भव्य स्पर्धेत ५० महाविद्यालयातील २०० गटांनी सहभाग घेतला होता.

या मेकरथॉन स्पर्धेत नवीन पनवेल मधील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील (सीकेटी) ११वी व १२वीच्या चार गटांनी सहभाग घेतला होता. सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागातून मिर्झा अब्दुल्ला शरीक (११वी सायन्स), निशांत संदीप पाटील (११वी सायन्स), ध्रुवल दीपक म्हात्रे (१२वी सायन्स), सुधाकर शिवगोपाल यादव (१२वी सायन्स) या गटाने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. या गटास पारितोषिक रक्कम रु. दहा हजार व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. तसेच या गटाच्या मार्गदर्शक शिक्षिका समिता वांगणे यांनाही पारितोषिक रक्कम रु. तीन हजार व ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.

क्रिएटिव्हिटी विभागातून उज्वल दलित सोनकांबळे, नशीबअली शजाद शेख, प्रणय संजय भोसले, यश नरेश कांबळे या११ वी सायन्सच्या गटाने द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. या गटास पारितोषिक रक्कम रु.सात हजार पाचशे व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. तसेच या गटाच्या मार्गदर्शक शिक्षिका आरती खुस्पे यांनाही पारितोषिक रक्कम रु. दोन हजार पाचशे व ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.

बीझाथॉन विभागातून आदित्य रतनलाल चौहान, किसान संजय वर्मा, समर्थ भार्गव पाटील, रीशांत महेश नारकर या ११वी कॉमर्सच्या गटास सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले तसेच सायन्स व टेक्नॉलॉजी या विभागातून साई संजय मोलवाडे, अथर्व अशोक लवणांग, वेदांत विलास पाटील, अर्चित रत्नाकर म्हात्रे या १२वी सायन्सच्या गटास सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

पान ६ वरुन..

# पनवेल महानगरपालिका

## वैदयकीय आरोग्य विभाग

कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल -410206

## पदभरती जाहिरात

2) राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत पुर्णवेळ वैदयकीय अधिकारी या पदाकरीता बंधपत्र (Bond) पुर्ण करण्यासाठी इच्छुक पात्र उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. 3) अर्जदाराच्या अर्जाची छाननी करून थेट मुलाखतीस पात्र झालेल्या उमेदवारांची यादी त्याच दिवशी सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल. 4) सदर प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार प्राप्त होणाऱ्या अर्जदारांच्या अर्जामधील गुणवत्तेनुसार / गुणांकन पद्धतीने (Merit) निवड प्रक्रिया राबविण्यात येईल. या संदर्भात सर्व अधिकार मा. अध्यक्ष, निवड समिती यांनी राखून ठेवले आहेत. 5) उमेदवाराची निवड शासनाकडील प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार गठित करण्यात आलेल्या निवड समितीच्या मान्यतेने व मा. अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांच्या दि.१७/०३/२०२२ रोजीच्या पत्रातील निकषानुसार १:३ व १:५ या प्रमाणामध्ये उमेदवारांची निवड गुणांकन पद्धतीने (Merit) करण्यात येईल. उमेदवाराची निवड करताना पदवी/पदविका परीक्षेतील अंतिम वर्षाचे गुण, अतिरिक्त शैक्षणिक अर्हता व अनुभव विचारात घेऊन खालील तक्त्यानुसार गुणांकन यादी तयार करण्यात येईल. **6) वैदयकीय अधिकारी, मायक्राबायोलॉजिस्ट व विशेषतज्ञ या पदांव्यतीरिक्त जाहिरातीतील इतर पदांकरीता खालील गुणांकन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.**

### गुणांकन पद्धती (Merit)

| अ.क्र | विवरण | तपशील | अधिक्तम गुण |
|---|---|---|---|
| 1 | पदासाठी आवश्यक Qualifiying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारी 50 प्रमाणे Propottion काढावे. (उदा. 60% गुण प्राप्त असल्यास त्याचे 50% प्रमाणे Proportion= 60*50/100=30)[ अधिकतम 50 गुण ] | 50 गुण |
| 2 | पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हते पेक्षाअधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी) | [ अधिकत्तम 20 गुण ] मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे 20 प्रमाणे Propottion काढावे. (उदा. अतिरिक्त शैक्षणिक अर्हतेच्या अंतिम वर्षात 60% गुण प्राप्त असल्यास त्याचे 20% प्रमाणे Propottion = 60*20/100=12 गुण) | 20 गुण |
| 3 | संबंधित पदाशी निगडित अनुभव | प्रत्येक वर्षासाठी 6 गुण. (1 वर्षाकरिता 6 गुण या प्रमाणे जास्तीत जास्त 30 गुण देता येतील) | 30 गुण |
| | | | एकुण 100 गुण |

7) उपरोक्त गुणांनुक्रमानुसार निवड करताना उमेदवारांची प्रवर्ग निहाय गुणांकन यादी (Merit List) तयार करण्यात येणार असुन त्यानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश E- Mail द्वारे / टपालाद्वारे पाठविणेत येतील. **8) गुणांकन पद्धतीनुसार (Merit) भरण्यात येणाऱ्या पदांकरीता कोणत्याही प्रकारची मुलाखत** घेण्यात येणार नाही. 9) गुणांकन यादी तयार केल्यानंतर दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांना समान गुण असल्यास, ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. तसेच उमेदवाराचे गुणांकन (Merit) व वय देखील समान असेल तर अशा वेळी उमेदवाराचा संबंधित पदाशी निगडित अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. 10) गुणांकन पद्धतीने निवड झालेल्या उमेदवारांची **निवड यादी** व निवडीस पात्र असलेल्या उमेदवारांची **प्रतिक्षा यादी** पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. 11) उमेदवाराने अर्जामध्ये नमुद केलेला ई-मेल आयडी पदभरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुरू राहील याची दक्षता घ्यावी व त्यासाठी वेळोवेळी ई-मेल तपासण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील. **सर्वसाधारण सुचना-** 1) सदर पदभरती प्रक्रिये बाबतच्या सर्व आवश्यक सुचना व माहिती पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरच वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. या करीता उमेदवारांनी www.panvelcorporation.com या अधिकृत संकेतस्थळास वेळोवेळी भेट देऊन माहिती प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत अर्जदाराची राहिल. पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही. 2) जाहीरातीत नमूद केलेली पदे ही पूर्णत: कंत्राटी स्वरुपाची असून ती राज्यशासनाची नियमित पदे नाहीत. तसेच या कंत्राटी पदांचा राज्य शासनाच्या पदांशी काहीही संबंध नसून उमेदवार भविष्यात राज्य शासनाच्या नियमित पदांवर समायोजन करण्याची मागणी करु शकणार नाही 3) जाहीरातीत नमूद केलेल्या पदांचे मानधन हे **एकत्रित मासिक ठोक मानधन** आहे. 4) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यानंतर सुट्टीचे दिवस वगळुन ७ दिवसांच्या आत नियुक्तीचे ठिकाणी सेवेमध्ये रूजु होणे अनिवार्य राहिल. उमेदवाराने निवडीसाठी कोणत्याही प्रकारच्या दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल व प्रतिक्षाधिन यादीमधील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल. 5) अर्ज भरतांना अराखीव प्रवर्गातील इच्छुक उमेदवारांनी फॉर्म सोबत खालील (१ ते १४) कागदपत्रे जोडावीत व राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी फॉर्म सोबत खालील (१ ते १६) कागदपत्रे जोडावीत.1) वयाचा पुरावा 2) शैक्षणिक अर्हतेसंबंधी सर्व आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे - उदा. पदवी/पदविका प्रमाणपत्र (Diploma / Degree Convocation ) 3) शैक्षणिक पात्रतेच्या गुणपत्रिका (सर्व वर्षांच्या गुणपत्रिका) 4) संबंधित महाराष्ट्र कौन्सिल (Medical / Paramedical) रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र अनिवार्य 5) शासकीय/निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्रे व कागदपत्रे 6) आधारकार्डची झेरॉक्स प्रत, PAN Card उपलब्ध असल्यास त्याची छायांकित प्रत 7) अलिकडील फोटो (2 प्रती) 8) विवाहित महिला अर्जदाराने नावात बदल केला असल्यास त्याबाबत राजपत्राची (Govt.Gazette) छायांकित प्रत. 9) पुरुष उमेदवाराच्या बाबतीत नावामध्ये काही कारणांमुळे बदल केलेला असल्यास शासनाच्या राजपत्राची (Govt. Gazette) छायांकित प्रत.10) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र (प्रतिज्ञापत्र)11) अर्जदारावर फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे विहित नमुन्यातील हमीपत्र12) महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) 13) राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) 14) MS – CIT Certificate प्रमाणपत्र15) जात प्रमाणपत्र / जात वैधता प्रमाणपत्र सर्व राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक आहे. 16) नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (अजा, अज प्रवर्ग वगळुन इतर राखीव प्रवर्गातील) उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक आहे.

### थेट मुलाखतीचे वेळापत्रक

| अ. क्र | पदाचे नाव | मुलाखत वार | वेळ | मुलाखतीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | **पुर्णवेळ / अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी** | दि 22.12.2025 रोजी | मुळ कागदपत्र तपासणी सकाळी 11 ते 01 थेट मुलाखत 02 ते 04 | पनवेल महानगरपालिका वैदयकीय आरोग्य विभाग देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी पनवेल -410206, |
| 2 | **मायक्रोबायोलॉजिस्ट / विशेषतज्ञ** | दि 23.12.2025 रोजी | मुळ कागदपत्र तपासणी सकाळी 11 ते 01 थेट मुलाखत 02 ते 04 | पनवेल महानगरपालिका वैदयकीय आरोग्य विभाग देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी पनवेल -410206, |

उपरोक्त तक्यात नमुद केल्यानुसार कंत्राटी पुर्णवेळ / अर्धवेळ वैदयकीय अधिकारी मायक्रोबायोलॉजिस्ट व विशेषतज्ञ या पदांकरीता थेट मुलाखतीसाठी एच्छुक व पात्र उमेदवारांनी दिलेल्या दिनांक व वेळेनुसार उपस्थित राहावे. तसेच उपरोक्त नमुद पदांव्यतिरिक्त जाहिरातीमधील इतर कंत्राटी पदांसाठी महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरील विहित नमुन्यातील अर्ज व त्या संबंधीची कागदपत्रे व प्रमाणपत्रे उपरोक्त वरील अटी व शर्तीनुसार पनवेल महानगरपालिका, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, वैद्यकीय आरोग्य विभाग, सिडको समाज केंद्र, सेक्टर 21 कामोठे, पनवेल 410206 (शासकीय सुट्टीचे दिवस वगळुन) या पत्त्यावर दिनांक 13.12.2025 ते 26.12.2025 या कालावधीत सकाळी 10.00 ते सायं 6.00 वाजेपर्यत सादर करावेत. विहित मुदतीत टपालाने, कुरीअरने व स्वहस्ते अर्ज स्विकारले जातील. **सदर कंत्राटी पदभरतीमध्ये नमुद पदांच्या संख्येमध्ये कमी अधिक बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच पदभरती प्रक्रियेमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे व अंशतः किंवा पूर्णत: रद्द करण्याचे अधिकार मा.अध्यक्ष, निवड समिती, पनवेल महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत, कृपया याची सर्व अर्जदारांनी नोंद घ्यावी.**

#### अर्जाचा नमुना

कार्यक्रमाचे नाव ---------------------------------------- व पदाचे नाव----------------------------------------

उमेदवाराचा नजीकच्या काळातील (रुंदी ३.५ से.मी व उंची ४.५. से.मी) आकाराचा फोटो चिकटवून स्वत: साक्षांकीत करावा

प्रति,
मा.आयुक्त
पनवेल महानगरपालिका

१. संपूर्ण नाव :--------------------------------------------------------
(प्रथम आडनाव )
२. वडिलांचे / पतीचे नाव :--------------------------------------------------------
३. कायमस्वरूपी राहण्याचा पत्ता :--------------------------------------------------------
--------------------------------------------------------
४. भ्रमणध्वनी क्रमांक :(१)------------------------------(२)-----------------------
५. जन्मतारीख :------------------------ दिनांक : / /२०२५ रोजीचे वय ----------
राष्ट्रीयत्व --------------------
६. उमेदवार विवाहीत / अविवाहित :---------------------------------------------
७. (अ) जात :-------------------------------- (ब) जात वैधता प्रमाणपत्र : आहे/ नाही.
८. धर्म :------------------------------------------------------------------
९. ई- मेल आयडी :------------------------------------------------------------------
१०. खाली नमुद केलेल्या प्रवर्गापैकी योग्य चौकोनात (✔) अशी खुण करावी.

| अ.जा (SC) | अ. ज (ST) | वि.जा (अ) (VJ-A) | भ.ज (ब) (NT-B) | भ.ज (क) (NT-C) | भ.ज (ड) (NT-D) | वि.मा.प्र (SBC) | इ.मा.व (OBC) | ई.डब्ल्यु.एस (EWS) | एस.ई.बी.सी (SEBC) | खुला (OPEN) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

११. शैक्षणिक अर्हता :

| उत्तीर्ण केलेली व्यवसायिक परिक्षा | विद्यापीठ/ मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | अंतिम वर्षाचे मिळालेले गुण (एकुण) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१२. अतिरिक्त अर्हता :-जसे पदवीत्तर

| उत्तीर्ण केलेली व्यवसायिक परिक्षा | विद्यापीठ/ मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | अंतिम वर्षाचे मिळालेले गुण (एकुण) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१३. अनुभव

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्षे | सेवा सोडल्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | पासुन | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१४.अवगत असणाऱ्या भाषा :

| | मराठी | हिंदी | इंग्रजी |
|---|---|---|---|
| बोलणे | | | |
| लेखन | | | |

१५. आपणा विरुद्ध न्याय प्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंग विषयक प्रकरण वा तत्सम इ. कारवाई चालु आहे काय ?(असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा)

१६. अर्जासोबत खालील छायांकित सत्य प्रती जोडलेल्या आहेत. (जात वैद्यता प्रमाणपत्र व स्त्री उमेदवारांनी विवाहानंतर नावात बदल झाला असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र/ नावात बदल झाल्याचे राजपत्र जोडणे बंधनकारक आहे.)

| | |
|---|---|
| १. | २ |
| ३. | ४. |

१७.वर नमुद केलेली सर्व माहिती खरी असनु ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुद्ध कायदेशिर कारवाई होईल यांची मला जाणीव आहे.

ठिकाण :
दिनांक : (अर्जदाराची स्वाक्षरी व नाव )

#### फौजदारी गुन्हा दाखल नसले बाबतचे हमीपत्र

मी.श्री./श्रीमती/कुमारी...........................................................

वय.............. वर्ष.............................सध्या राहणार असे लिहुन देते/देतो की, या पत्यावर ..............वर्षापसून आजपर्यंत राहत आहे.

तरी मी वास्तव्य करीत असलेल्या वरील नमूद कालावधीत माझेविरुद्ध मी राहत असलेल्या कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनच्या आभिलेखावर काहीएक दखलपात्र गुन्हा अथवा आक्षेपार्ह नोंदी नाही.

सही/-

#### प्रतिज्ञापन

**नमुना अ**

मी श्री./श्रीमती/कुमारी .............................................................

श्री.............................................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी

वय....... वर्ष, राहणार,.............................................................

याद्वारे असे जाहिर करतो/करते की,

(१) मी ............................................ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ..............(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २३ जुलै, २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ............ आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)

(३) दिनाक २३ जुलै, २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै, २०२० व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण:-
सही/-
दिनांक:-

**(डॉ. आनंद गोसावी)**
**वैदयकीय आरोग्य अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

# सैयद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेदरम्यान मॅच फिक्सिंग

## चार खेळाडू निलंबित; तपास पूर्ण होईपर्यंत खेळण्यास बंदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सैयद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेदरम्यान मॅच फिक्सिंगचे गंभीर आरोप झाल्यानंतर चार भारतीय खेळाडूंना निलंबित करण्यात आले आहे. आसाम क्रिकेट असोसिएशनने तातडीने कारवाई करत ईशान अहमद, अमन त्रिपाठी, अमित सक्सेना आणि अभिषेक ठाकूर यांना सस्पेंड केले आहे.




या प्रकरणी गुवाहाटी क्राइम ब्रँचने एफआयआर दाखल केला असून तपास पूर्ण होईपर्यंत या खेळाडूंना असोसिएशनतर्फे आयोजित कोणत्याही स्पर्धेत सहभागी होण्यास बंदी घालण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर भारतात मॅच फिक्सिंगसाठी नेमकी कायदेशीर शिक्षा काय आहे आणि अशा प्रकरणांत कोणती कलमे लावली जातात याबाबत चर्चा सुरू झाली आहे.

भारतामध्ये मॅच फिक्सिंगसाठी स्वतंत्र असा कोणताही विशेष कायदा सध्या अस्तित्वात नाही. काही देशांनी यासाठी स्वतंत्र कायदे केले असले, तरी भारतात तपास यंत्रणांना फौजदारी कायद्यावरच अवलंबून राहावे लागते.

फौजदारी प्रकरणांचा तपास आणि निकाल प्रक्रिया वेळखाऊ असली तरी भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) अशा प्रकरणांत अत्यंत कठोर भूमिका घेते.

आपल्या अँटी-करप्शन युनिट आणि आचारसंहितेच्या आधारे बीसीसीआय खेळाडूंना तात्पुरते निलंबित करू शकते, दीर्घकालीन बंदी घालू शकते आणि गुन्हा सिद्ध झाल्यास आजीवन बंदीदेखील घालू शकते.

म्हणूनच मॅच फिक्सिंगच्या आरोपांमध्ये कायदेशीर कारवाईपेक्षा बीसीसीआयची शिस्तभंगात्मक कारवाई अधिक प्रभावी ठरत असल्याचे चित्र आहे.

### किती शिक्षा होऊ शकते?

भारतीय न्याय संहितेतील फसवणूक आणि गुन्हेगारी कटासारख्या कलमांखाली गुन्ह्याच्या तीव्रतेनुसार आणि आर्थिक व्यवहारांच्या रकमेवर आधारित सात वर्षांपर्यंत कारावास आणि दंडाची शिक्षा होऊ शकते, मात्र आजवरच्या प्रकरणांमध्ये मॅच फिक्सिंग प्रकरणांत दोष सिद्ध होणे कठीण आहे. यामागे ठोस पुराव्यांची कमतरता आणि स्वतंत्र कायदेशीर चौकटीचा अभाव ही प्रमुख कारणे आहेत.

# आशियाई पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत गणेश तोटेला कांस्यपदक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तुर्की येथे सुरू असलेल्या आशियाई पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत भारताच्या गणेश तोटे याने दमदार कामगिरी करत पुरुषांच्या १०५ किलोग्रॅम वजनगटात कांस्यपदकाची कमाई केली. स्क्वॉटमध्ये ३३२.५ किलोग्रॅम, डेडलिफ्टमध्ये २६५ किलोग्रॅम आणि बेंचप्रेसमध्ये किलोग्रॅम असे एकूण ८१७.५ किलोग्रॅम वजन उचलत त्याने भारताचा तिरंगा गौरवाने फडकाविला.




रायगड जिल्ह्याच्या पनवेल तालुक्यातील भिंगारी गावचा रहिवासी असलेला गणेश सध्या सासवड येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळ संचालित वाघिरे महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. स्पर्धेच्या प्रारंभी स्क्वॉट प्रकारात ३३२.५ किलोग्रॅम वजन उचलत तो द्वितीय स्थानी होता, मात्र बेंचप्रेस प्रकारात इराणच्या आलाफ बेह बहाणी हुसेनीने आघाडी घेत त्याला तृतीय स्थानी ढकलले. इराणी खेळाडूने सातत्य राखल्याने रौप्यपदकाची झुंज थोडक्यात हुकली. मशिन्तो सेर्गी या न्यूट्रल खेळाडूने तिन्ही प्रकारात उत्तुंग कामगिरी करीत सुवर्णपदक पटकाविले.

स्पर्धेच्या आठवडाभर आधीच वडिलांचे निधन होऊनही देशासाठी पदक जिंकण्याचे स्वप्न मनाशी जपलेल्या गणेशने दाखविलेली जिद्द आणि चिकाटी अत्यंत अनुकरणीय आणि अभिमानास्पद आहे. आपल्या यशाचे श्रेय गणेशने आई-वडील, कुटुंबीय, प्रशिक्षक विशाल मुळे व प्रमोद पवार, सहकारी खेळाडू, तसेच महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक प्रा. प्रीतम ओव्हाळ यांना दिले. सर्व स्तरांतून गणेशचे कौतुक होत आहे.

# रायगड जिल्हा कुस्ती निवड चाचणी स्पर्धा मंगळवारी पनवेलच्या नितळसमध्ये

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत भाग घेण्यासाठी रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशनची निवड चाचणी स्पर्धा असोसिएशनचे अध्यक्ष परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली १६ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा श्री छत्रपती संभाजी महाराज व लोकनेते मा. श्री. रामशेठ ठाकूर राष्ट्रीय कुस्ती संकुल नितळस (ता.पनवेल) येथे होईल.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या वतीने १७ वर्षाखालील कुमार फ्रीस्टाईल व ग्रीकोरोमन राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा १८ ते १९ डिसेंबर या कालावधीत जिम्नाशियन हॉल, क्रीडा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. त्या अनुषंगाने रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशनची निवड चाचणी स्पर्धा होईल.

सकाळी ९ ते ११ वाजेदरम्यान वजने झाल्यानतंर लगेच कुस्ती स्पर्धा चालू होईल. फ्रीस्टाईल आणि ग्रीकोरोमन प्रकारात आणि ४५, ४८, ५१, ५५, ६०, ६५, ७१, ८०, ९२ व ११० अशा सर्व किलो वजनी गटात होणार आहे. अधिक माहितीसाठी विनोद नाईक (८८९८७७७७११), रूपेश पावशे (९५९४६३९२९७) किंवा साजन पावशे (८४५२९९०९७६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## राष्ट्रीय मिल मजदूर संघाची कबड्डी स्पर्धा

# इन्शुअर कोट, शिवशक्ती संघ आंबेकर चषकाचे मानकरी

**मुंबई : प्रतिनिधी**

इन्शुअर कोट (पुणेरी फलटण), शिवशक्ती महिला या कबड्डी संघांनी अनुक्रमे पुरुष व्यावसायिक व महिला गटात आंबेकर चषक पटकविला. शिवशक्तीला या विजयासाठी ५-५ चढायाच्या डावापर्यंत झुंजावे लागले. इन्शुअर कोटचा अभिषेक गुंगे व्यावसायिक पुरुषांत, तर शिवशक्तीची शुभदा खोत महिलात स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरले.

श्रमिक जिमखाना येथे स्पर्धेच्या अंतिम दिनी व्यावसायिक पुरुष गटाच्या अंतिम सामन्यात इन्शुअर कोट (पुणेरी फलटण) संघाने न्यू इंडिया इन्शुरन्सचा प्रतिकार ४१-१२ असा सहज संपुष्टात आणत ग.दि. आंबेकर चषक व रोख १५ हजार रुपये आपल्या खात्यात जमा केले. उपविजेत्या संघाला रोख १० हजार रुपये व चषकावर संतुष्ट व्हावे लागले.

प्रो-कबड्डी खेळाडूचा भरणा असलेल्या इन्शुअर कोट संघाने सुरुवातीपासून आक्रमक खेळ करीत पूर्वार्धातच दोन लोण देत २५-०५ अशी भक्कम आघाडी घेतली. या २० गुणांच्या आघाडीने इन्शुअर कोटने आपला विजेतेपदाचा दावा पक्का केला. त्यांनी उत्तरार्धात खेळाची गती थोडी कमी केली, पण आणखी एक लोण देत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. अभिषेक गुंगे, रमेश गायकवाड यांच्या झंझावाती चढाया त्यांना दादासो पुजारी, वैभव राबाडे यांच्या बचावाची मिळालेली भक्कम साथ यामुळे त्यांनी २९ गुणांच्या फरकाने हा विजय मिळविला. न्यू इन्शुरन्सच्या रजत सिंग याची या सामन्यात डाळ शिजली नाही.





महिलांच्या अंतिम सामन्यात शिवशक्ती महिला संघाने आपला पारंपरिक प्रतिस्पर्धी डॉ. शिरोडकर संघाचा कडवा प्रतिकार ५-५ चढायांत ४३-३८ (९-५) मोडून काढत रोख सात हजार रुपये व आंबेकर चषक आपल्याकडे खेचून आणला. उपविजेत्या संघाला रोख पाच हजार रु. व चषकावर समाधान मानावे लागले. शिवशक्तीने आक्रमक सुरुवात करीत पहिल्या डावात दोन लोण देत २६-११ अशी आश्वासक आघाडी घेत सुरुवात झोकात केली, पण दुसऱ्या डावात डॉ. शिरोडकरने टॉप गिअर टाकत या दोन लोणची परतफेड करीत सामना २३-२३ असा बरोबरीत सोडविला.

कबड्डीतील नियमाप्रमाणे सामन्याच्या निकालासाठी ५-५ चढायांचा डाव खेळविण्यात आला. यात शिवशक्तीने चार गुणांनी बाजी मारली. शुभदा खोत, पूजा यादव यांच्या चढाया त्यांना पौर्णिमा जेधे, प्राची भदवणकर यांची पकडीची मिळालेली भक्कम साथ यामुळे शिवशक्तीने शेवटच्या क्षणी विजय साकारला. डॉ. शिरोडकरच्या साक्षी सावंत, कशिश पाटील, श्रावणी घाडीगावकर यांनी संघाला दुसऱ्या डावात बरोबरी साधून दिली, पण राष्ट्रीय खेळाडू मेघा कदम हिचा हरवलेला फॉर्म शिरोडकरच्या पराभवाला कारणीभूत ठरला.

या अगोदर झालेल्या व्यावसायिक पुरुषांच्या उपांत्य सामन्यात इन्शुअर कोटने मुंबई पोस्टलला ४५-१३ असे, तर न्यू इंडिया इन्शुरनसने युनियन बँकेला ३१-२७ असे पराभूत करीत अंतिम फेरी गाठली होती. महिलांत शिवशक्तीने अमर हिंदला ४५-१३ असे, तर डॉ. शिरोडकरने मुंबई पोलीस जिमखाना संघाला ४७-२८ असे चीत करीत अंतिम फेरीत धडक दिली होती.

न्यू इंडियाचा रजत सिंग व्यावसायिक पुरुषांत, तर डॉ. शिरोडकरची कशिश पाटील महिलांत स्पर्धेतील उत्कृष्ट चढाईचे खेळाडू ठरले. इन्शुअर कोटचा अथर्व धुमाळ व्यावसायिक पुरुषांत, तर शिरोडकरची श्रावणी घाडीगावकर महिलांत स्पर्धेतील उत्कृष्ट पकडीचे खेळाडू ठरले.

# स्टार फुटबॉलपटू मेस्सीच्या कोलकाता भेटीला गालबोट

**कोलकाता : वृत्तसंस्था**

महान फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी याच्या बहुचर्चित कोलकाता भेटीला गोलबोट लागले. मेस्सी स्टेडियममध्ये १० मिनिटांपेक्षा कमी वेळ उपस्थित होता. यामुळे त्याची एक झलक पाहण्यासाठी तासन्तास वाट पाहणाऱ्या अनेक चाहत्यांची निराशा झाली. त्यांनी घोषणाबाजी करत मैदानावर बाटल्या फेकल्या.



स्टार फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी कोलकात्याच्या आयकॉनिक सॉल्ट लेक स्टेडियममध्ये दाखल झाला. अर्जेंटिनाच्या दिग्गज खेळाडूची एक झलक पाहण्यासाठी चाहत्यांमध्ये प्रचंड उत्साह होता. फुटबॉलप्रेमींनी अभूतपूर्व उत्साहात मेस्सीचे स्वागत केले. मेस्सीने खचाखच भरलेल्या सॉल्ट लेक स्टेडियममध्ये प्रवेश करताच चाहत्यांनी एकच जल्लोष केला. त्याच्या जयघोषाने स्टेडियम दणाणून गेले. उभे राहून चाहत्यांनी झेंडे फडकावले आणि एकसुरात त्याचे नाव घेत घोषणा दिल्या.

शाहरुख खान आपला धाकटा मुलगा अबराम खान याच्यासोबत कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहचला आणि दोघांनीही मेस्सीसोबत छायाचित्रे काढण्यासाठी अशी पोझ दिली.

मेस्सीला इतर व्हीव्हीआयपीसोबत मैदानाबाहेर काढण्यापूर्वी तो स्टेडियममध्ये १० मिनिटांपेक्षा कमी वेळ उपस्थित होता. अर्जेंटिनाचा आयकॉन पाहण्याच्या आशेने तासन्तास वाट पाहणाऱ्या अनेक चाहत्यांना त्याची व्यवस्थित झलक न मिळाल्याने निराशा झाले. काही चाहत्यांनी पोस्टरचे फलक फाडले, बाटल्या फेकल्या. यामुळे

### जास्त वेळ न दिल्याने प्रेक्षकांनी घातला गोंधळ

स्टेडियमवर काही काळ प्रचंड तणाव निर्माण झाला. सुरक्षा व्यवस्था वाढ करण्यात आली.

स्टेडियमवरील परिस्थिती सोशल मीडियावर व्हायरल झाली, ज्यात झालेल्या गोंधळाचे चित्र स्पष्ट झाले. भारतीय फुटबॉल चाहत्यांसाठी ऐतिहासिक आणि आनंदी असा हा क्षण गालबोट लागून संपुष्टात आला.

कार्यक्रमासाठी आलेल्या स्टार फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीच्या चाहत्यांनी आयोजकांवर आपला तीव्र रोष व्यक्त केला. एका चाहत्याने एएनआयशी बोलताना सांगितले की, या कार्यक्रमाचे नियोजन अत्यंत वाईट होते. मेस्सी फक्त १० मिनिटांसाठी आला आणि निघून गेला. किती पैसे, भावना आणि वेळ वाया गेला! आम्हाला काहीच पाहता आले नाही.

दरम्यान, लिओनेल मेस्सी आणि सर्व क्रीडाप्रेमींची या दुर्दैवी घटनेबद्दल पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सार्वजनिकरित्या माफी मागितली आहे. त्या म्हणाल्या, ही घटना अत्यंत दुर्दैवी असून यामुळे राज्याच्या प्रतिमेला ठेच पोहचली आहे. मी माफी मागते. सीएम बॅनर्जी यांनी या प्रकरणाच्या चौकशीसाठी निवृत्त न्यायाधीश आशीम कुमार रे यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय तपास समिती स्थापन करण्यात आली आहे.

# न्यूझीलंडच्या विजयाचा टीम इंडियासह पाकला फटका

## डब्ल्यूटीसी गुणतालिकेत मोठी उलथापालथ

**वेलिंग्टन : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडच्या संघाने वेलिंग्टन येथील बेसिन रिझर्व्हच्या मैदानातील दुसऱ्या कसोटी सामन्यात वेस्ट इंडिजच्या संघाला नऊ विकेट्सने पराभूत केले. या विजयासह न्यूझीलंडने तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. ‘किवी’ संघाने डब्ल्यूटीसी स्पर्धेतील विजयाचे खाते उघडताच भारताचे गुणतालिकेत गणित बिघडले आहे.

आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेतील पहिल्या हंगामात टीम इंडियाला पराभवाचा दणका देणाऱ्या न्यूझीलंड संघाने वेस्ट इंडिजविरुद्धच्या लढतीने डब्ल्यूटीसीच्या चौथ्या चक्राची सुरुवात केली. पहिला सामना अनिर्णित राहिल्यावर न्यूझीलंडच्या संघाने दुसऱ्या सामन्यात विजय मिळवला. या निकालानंतर एक विजय आणि एक अनिर्णित सामन्यानंतर न्यूझीलंडचा संघ ६६.६७ विजयी टक्केवारीसह चौथ्या स्थानावर विराजमान झाला आहे. श्रीलंकन संघाची विजयी टक्केवारी न्यूझीलंडच्या बरोबरीने असून ते तिसऱ्या स्थानावर आहेत.

न्यूझीलंड आणि वेस्ट इंडिज यांच्यातील कसोटी सामन्याच्या निकालाचा टीम इंडियासह पाकिस्तानलाही फटका बसला आहे. पण भारतीय संघापेक्षा पाकिस्तान भारी ठरल्याचे दिसते. टीम इंडिया पाचव्या स्थानावरून सहाव्या स्थानावर गेली आहे. भारतीय संघाने आतापर्यंत नऊ सामने खेळले असून यातील चार विजय चार पराभव आणि एका अनिर्णित सामन्यासह भारताची विजयाची टक्केवारी ४८.१५ इतकी आहे. दुसरीकडे पाकिस्तानचा संघाची विजयी टक्केवारी ५० असून ते भारतीय संघाचे किंचित पुढे असल्याचे दिसून येते.

डब्ल्यूटीसी २०२५-२७च्या नव्या सर्कलमध्ये ऑस्ट्रेलियन संघ सर्वात आघाडीवर आहे. आतापर्यंत पाच कसोटी सामन्यातील सर्वच्या सर्व सामने जिंकत त्यांनी १०० टक्के कामगिरीसह अव्वलस्थानावर कब्जा केला आहे. द. आफ्रिकेचा संघाची विजयाची टक्केवारी ७५ इतकी असून ते दुसऱ्या स्थानी आहेत.





**पनवेल : कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकारातून पनवेल विधानसभा मतदारसंघातील महिलांना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या घरघंटी व शिलाई मशीन वाटप उपक्रमाचा पुढील टप्पा शनिवारपासून सुरू झाला. शहरी भागातील प्रभाग १४ ते २०मधील लाभार्थी महिलांना या वेळी मशीनचे वाटप करण्यात आले. काही दिवसांपूर्वी प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेंतर्गत जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या माध्यमातून याचा शुभारंभ करण्यात आला होता. पहिल्या टप्प्यात ग्रामीण भागातील मोठ्या संख्येने महिलांना शिलाई मशीन व घरघंटीचे वाटप करण्यात आले होते. शनिवारपासून शहरी भागातील लाभार्थी महिलांना मशीन व प्रमाणपत्रांचे वाटप करून हा उपक्रम यशस्वीरीत्या पूर्णत्वास नेण्यात येत आहे. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनातून या वेळी उपस्थित सर्वांना बालविवाहाविरोधात शपथ देण्यात आली. भविष्यात उपलब्ध निधीनुसार या उपक्रमाचा पुढचा टप्पाही राबविण्यात येणार आहे.**






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com